

आनंद सागर मंगल कार्यालय
शाकाहारी करिता
एका मंगलमय कार्यासाठी लागणारी सर्व प्रकारची सेवा एकाच छताखाली. आता आनंद सागर मंगल कार्यालय येथे रात्रीच्या कार्यक्रमासाठी भव्य लॉन्स उपलब्ध.
* लग्न सोहळा * साखरपूडा * रिसेप्शन * वाढदिवस
* गेट टुगेदर * कॉन्फरन्स * सांस्कृतिक कार्यक्रम
आसना बायपास चौरस्ता, गोरक्षण, जवळ, देशमुख गॅस पंपासमोर कामठा (बु.) नांदेड
व्यवस्था: स्वागत मंडप डेकोरेटर्स, मो. 9325610507,7972904719



# गोदातीर समाचार

स्थापना-१९६२ — ६४

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026

संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com



जोशी बंधू यांचे ..!!
शंकर भट्ट मंगल कार्यालय

मंगल कार्यासाठी लागणारी सर्व प्रकारची सेवा एकाच छताखाली आपल्या सेवेत..!!
(लग्न, साखरपुडा, मुंज, रिसेप्शन, वाढदिवस, बारसे, डोहाळ जेवण, स्वागत समारोह व ईतर...)
पत्ता : भगवान परशुराम चौक किनवट रोड भोकर मो. क्र. 9765983335/9960659975/9881881934/9527889927



* वर्ष ६४ वे * अंक १६२ * नांदेड * बुधवार, दि. १८ जून २०२५ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎ : 255777, Fax :252211


# इस्त्रायलच्या मोसाद मुख्यालयावर इराणचा हल्ला, पत्त्यासारखी कोसळली इमारत

**तेल अविव (वृत्तसंस्था)–** इस्रायल आणि इराणमधील संघर्ष पाचव्या दिवशीही सुरू आहे. किंबहुना हा संघर्ष आता विकोपाला पोहोचला असल्याचे पाहायला मिळत आहे. दोन्हीही देश एकमेकांच्या जिवावर उठले असल्यासारखा हल्ल्यांवर हल्ले करत आहे. ज्यामध्ये इराणने इस्रायलच्या मोसाद मुख्यालयावर बेलिस्टिक क्षेपणास्त्र डागले. इस्रायलची राजधानी तेल अव्हीवमध्ये मोसादचे हे मुख्य कार्यालय आहे. याच कार्यालयावर हा हल्ला करण्यात आल्याचे सांगितले जात आहे. हल्ल्याचा व्हिडिओ देखील समोर आला आहे.



मंगळवारी, इराणने तेल अवीव येथील इस्रायलच्या गुप्तचर संस्थेच्या मोसादच्या मुख्यालयावर हवाई हल्ला केला आहे. याशिवाय लष्करी गुप्तचर संस्थेशी संबंधित अमान या गुप्तचर संस्थेच्या इमारतीलाही लक्ष्य करण्यात आले असल्याची माहिती समोर आली आहे.

इस्रायलने इराणवर हल्ला केल्यापासून मध्यपूर्वेतील राजकीय तापमान वाढले आहे. इस्रायलच्या हल्ल्यानंतर इराणने प्रत्युत्तर दिले आहे आणि अनेक इस्रायली शहरे उध्वस्त केली आहेत. इराणच्या ड्रोन हल्ल्यामुळे नेतन्याहूच्या देशात मोठ्या प्रमाणात विनाश झाला आहे. अनेक लष्करी तळ उद्धवस्त झाले आहेत, गुरियन विमानतळ उद्धवस्त झाले आहे. इराणने इस्रायलच्या संरक्षण मंत्रालय आणि परराष्ट्र मंत्रालयावरही क्षेपणास्त्र हल्ले केले आहेत, ज्यामुळे ही सर्व प्रमुख ठिकाणे उद्धवस्त झाली आहेत. ज्यात आता इराणने जगातले सर्वात भयानक आणि आक्रमक मानली जाणारी इस्रायलची गुप्तचर संस्था मोसादचे मुख्यालयही अगदी पत्त्यांप्रमाणे उडवून दिलं आहे. ज्याचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे.

इस्रायलने इराणच्या अणुस्थळावर हल्ला करताना तेहरानमधील अनेक महत्त्वाच्या ठिकाणी एअर स्ट्राइक केले, या हल्ल्यात इराणचे सर्वोच्च लष्करी अधिकारी मेजर जनरल अली शादमानी यांचा मृत्यू झाला आहे. शादमानी हे इराणच्या खातम-अल-अंबिया मुख्यालयाचे म्हणजेच लष्करी आपत्कालीन कमांडचे प्रमुख होते.

## पुढील काही दिवस राज्यात मुसळधार पाऊस

**मुंबई (प्रतिनिधी)–** मागील दोन दिवसांपासून मुंबईत पावसाचे जोरदार आगमन झाले आहे. पुढील चार ते पाच दिवस कोकण आणि मध्य महाराष्ट्रात पावासाचा जोर वाढण्याचा अंदाज हवामान खात्याने व्यक्त केला. जूनच्या सुरवातीलाच पावसाचे आगमन झाल्याने काही भागात पावसाच्या सरी बरसल्या, त्यामुळे शनिवारी काही भागात पावसाचा जोर वाढला.

मुंबईतही रविवारी आणि सोमवारी पावसाने झोडपून काढले. सध्या हवामानात बदल झाल्याने काही ठिकाणी जोरदार पाऊस वाढण्याची शक्यता आहे. हवामान विभागाने वर्तवलेल्या अंदाजानुसार पुढील कोकणातील काही भागात मध्य महाराष्ट्र आणि विदर्भातील काही जिल्ह्यासहीत मुसळधार पावसाची शक्यता आहे. तसेच रायगड, रत्नागिरी, आणि सिंधुदुर्ग या भागात मुसळधार ते अतिमुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. याचबरोबर पुणे, सातारा, कोल्हापूर, या भागातही अतिमुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे.

# मंत्रिमंडळाच्या बैठकीत शेतीसाठी एआय धोरण मंजूर, आणीबाणीत कारावास भोगलेल्यांचं मानधन दुप्पट

**मुंबई (प्रतिनिधी)–** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली राज्य मंत्रिमंडळाची बैठक मंगळवारी संपन्न झाली. या बैठकीत १० मोठे निर्णय घेण्यात आले असून राज्यात शेतीसाठी ख धोरणास मंजुरी देण्यात आली आहे. यासह, आणीबाणीच्या काळात तुरुंगवास भोगलेल्या नागरिकांच्या मानधनात दुप्पट वाढ करण्यात आली आहे.

महाराष्ट्र कृषि- कृत्रिम बुद्धिमत्ता महाग्री-एआय धोरण २०२५ ते २०२९ मंजूर करण्यात आलं आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता आणि उदयोन्मुख तंत्रज्ञानाचा वापर करून कृषि क्षेत्रात परिवर्तन घडविता येणार आहे. त्यामुळे, मंत्रिमंडळ बैठकीतील हा निर्णय शेतकऱ्यांसाठी अत्यंत महत्त्वाचा ठरेल. यासह, धारावी पुनर्विकास, अनिवासी भारतीयांच्या मुलांच्या शिक्षणाबाबतही महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला आहे. यासह ट्रायबल इंडस्ट्रियल क्लस्टरसाठी महाराष्ट्र औद्योगिक विकास म हामंडळास नाशिक जिल्ह्यातील मौजे जांबुटके येथील २९ हेक्टर ५२ आर जमीन. आदिवासी सम ाजातील होतकरू उद्योजकांना प्रोत्साहन, रोजगार निर्मिती व आर्थिक विकासास चालना मि ळणार, एमएमआरडीए आणि मेसर्स रायगड पेण ग्रोथ सेंटर लि. यांच्या संयुक्त प्रकल्पासाठी आवश्यक जमिनीवरील मुद्रांक शुल्कात सवलत. सार्वजनिक, खासगी भागिदारीतून हा राज्यातील पहिलाचा मोठा प्रकल्प. ग्रोथ सेंटरमुळे विदेशी गुंतवणूक आकर्षित होणार, मुंबईतील महाराष्ट्र राष्ट्रीय विधि विद्यापीठासाठी आवश्यक मौजे पहाडी गोरेगाव येथील जमि नीच्या हस्तांतरणावरील मुद्रांक शुल्क माफ. विद्यापीठाला स्व-मालकीची इमारत मिळणार. हजारो विद्यार्थ्यासाठी शैक्षणिक सुविधा उपलब्ध होणार आहे. तसेच धारावी पुनर्विकास प्रकल्पातील विशेष हेतू कंपनी आणि अन्य यंत्रणा दरम्यानच्या भाडेपट्टा करारावरील मुद्रांक शुल्क माफ. लोकहितार्थ मोठा प्रकल्प असल्याने, पुनवर्सन व पुनर्विकास योजनेला गती लाभ होणार आहे. यासह महाराष्ट्र कृषि- कृत्रिम बुद्धिमत्ता महाग्री-एआय धोरण २०२५-२०२९ मंजूर. कृषि क्षेत्रातील कृत्रिम बुद्धिमत्ता आणि उदयोन्मुख तंत्रज्ञानाचा वापर करून परिवर्तन घडविता येणार. कृत्रिम बुद्धीमत्ता, निर्मितीक्षम कृत्रिम बुद्धीमत्ता, इंटरनेट ऑफ थिंग्ज, ड्रोन, संगणकीय दृष्टीक्षमता, रोबोटिक्स, पूर्वानुमान विश्लेषण यांचा वापर करत, राज्यातील ग्रीस्टॅक, महा-ग्रीस्टेक, महावेद, क्रॉपसॅप, गमार्कनेट, डिजीटल शेतीशाळा, महा-डीबीटी यांसारखे प्रकल्प पुढे नेण्यास मदत होणार आहे. यासह अनेक निर्णय दि. १७ जून रोजी झालेल्या बैठकीत घेण्यात आले आहेत.

# नांदेड शहरासह जिल्ह्यातील पोलीस अधिकाऱ्यांचे खांदेपालट; भाग्यनगरला संतोष तांबेंना पाठविले

**नांदेड (प्रतिनिधी)–** पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी सहा पोलीस निरीक्षक, बारा सहायक पोलीस निरिक्षक आणि आकरा पोलीस उपनिरीक्षकांना नवीन नियुक्त्या दिल्याचे आदेश जारी केले आहेत. आस्थापना मंडळाच्या शिफारशीनुसार हे आदेश करण्यात आले आहेत. पदस्थापना सध्या तात्पुरत्या स्वरुपात आहेत.

पोलीस अधिक्षक यांनी जारी केलेल्या आदेशानुसार नियंत्रण कक्षातील पोलीस निरीक्षक सदाशिव भडीकर यांना धर्माबाद पोलीस ठाण्यात पाठविण्यात आले आहे. धर्माबादचे पोलीस निरिक्षक बाळासाहेब रोकडे यांना नियंत्रण कक्षात बोलाविण्यात आले आहे. संतोष तांबे यांना भाग्यनगर पोलीस ठाण्यात नियुक्ती मिळाली आहे आणि भाग्यनगरचे रामदास शेंडगे यांना नियंत्रण कक्षात बोलाविण्यात आले आहे. राजेश पुरी यांना शिवाजीनगर पोलीस ठाण्यात पाठविले आहे आणि शिवाजीनगर येथील शिवाजी गुरमे यांना नियंत्रण कक्षात बोलाविण्यात आले आहे. नियंत्रण कक्षातील बालाजी भंडे यांना जिल्हा विशेष शाखेत प्रभारी अधिकारी करण्यात आले आहे.

बस्वराज तमशेट्टे- नियंत्रण कक्ष (मुखेड), रामचंद्र केदार- लोहा (वाचक उपविभागीय पोलीस अधिकारी कंधार), अनिल काचमांडे-नियंत्रण कक्ष (शिवाजीनगर), अनुपमा केंद्रे- मरखेल / भाग्यनगर) नियंत्रण कक्षातील नव्याने



नियुक्ती मिळालेले सहायक पोलीस निरिक्षक नृसिंह आनलदास- प्रतिबंधक सेल, बालाजी महाजन- भाग्यनगर, संदीप थडवे- शिवाजीनगर, लता पगलवार- धर्माबाद, उमाकांत पुणे- वजिराबाद, रामकृष्ण पाटील- कंधार, श्रीधर जगताप- एएचटीयु नांदेड या सहायक पोलीस निरीक्षकांची बदली करण्यात आली आहे.

तर नियंत्रण कक्षातील पोलीस उपनिरिक्षक सुमित बासंबेकर- संगणक प्रशिक्षण अर्ज शाखा नांदेड, शंकर मोरे- मुक्रामाबाद, गौतम वाहुळे- वाचक इतवारा उपविभाग, हेमंत देशपांडे- विमानतळ, शंकर देशमुख- जिल्हा विशेष शाखा, विजय पंतोजी- बिलोली, सुनिल जाधव- कुंटूर, अविनाश चव्हाण- वजिराबाद, संदीप भोसले- उपविभागीय पोलीस अधिकारी- इतवारा, आशिष बोराटे- विमानतळ (मनाठा), सय्यद अनीस फातेमा-संगणक शाखा (विमानतळ) या पोलीस उपनिरीक्षकांची बदली करण्यात आली आहे.

## नागपूरमध्ये इंडिगो विमानाचे आपत्कालीन लँडिंग, बॉम्बच्या धमकीचा फोन

**नागपूर (प्रतिनिधी)–** मंगळवारी कोचीहून दिल्लीला जाणाऱ्या इंडिगो एअरलाइन्सच्या विमानात बॉम्बची धमकी असल्याचा फोन आल्यामुळे एकच खळबळ उडाली. सुरक्षा यंत्रणांच्या सतर्कतेमुळे विमानाचे नागपूर विमानतळावर आपत्कालीन लँडिंग करण्यात आले, जिथे सर्व प्रवाशांना सुरक्षितपणे बाहेर काढण्यात आले आणि विमानाची तपासणी करण्यात आली.

मंगळवारी सकाळी ९:२० वाजता कोचीहून दिल्लीला जाणाऱ्या इंडिगो विमान क्रमांक ६ई २७०६ मध्ये बॉम्बची धमकी आल्याने प्रवाशांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते, त्यानंतर ते नागपूर विमानतळावर उतरवण्यात आले.

# क्रिकेट कसोटी सामना पाचऐवजी चार दिवसांचा होण्याची शक्यता

**मुंबई (प्रतिनिधी)–** आयसीसी वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिप आल्यापासून कसोटी क्रिकेटचा थरार आणखी रोमांचक झाला आहे. आता आपल्याला संघांमध्ये रोमांचक लढाई पाहायला मिळते. पण, ते अधिक मनोरंजक बनवण्यासाठी, आयसीसी नवा फॉर्म्युला घेऊन येणार आहे.

एका अहवालानुसार, आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषद (आयसीसी) २०२७-२९ वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिप स्पर्धेत लहान देशांसाठी चार दिवसांच्या कसोटी सामन्यांना मान्यता देणार आहे, परंतु भारत, ऑस्ट्रेलिया आणि इंग्लंड हे तिन्ही देश एकमेकांविरुद्ध पारंपारिक पाच दिवसांचे सामने खेळतील. सामन्यांची संख्या एका दिवसाने कमी करण्याचा निर्णय एका महत्त्वाच्या आणि मोठ्या बदलाकडे निर्देश करत आहे.

गेल्या आठवड्यात लॉर्ड्स येथे झालेल्या डब्ल्यूटीसी फायनलमध्ये झालेल्या चर्चे दरम्यान, आयसीसी अध्यक्ष जय शाह यांनी २०२७-२९ डब्ल्यूटीसी सायकलसाठी चार दिवसांच्या कसोटी सामन्यांना पाठिंबा दर्शविला आहे. अंतिम सामन्यादरम्यान यावर चर्चा करण्यात आली जेणेकरून नियम वेळेत मंजूर करता येईल आणि त्यासाठी नियम बनवता येतील.

## सुपरपॉवर देशांची झोप उडाली; गुप्त फाइटर जेट जाळ्यात अडकल्याने खळबळ

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** ब्रिटिश रॉयल एअरफोर्सचे अत्याधुनिक फायटर जेट एफ-३५ मागील ४८ तासांपासून उड्डाण करू शकलेले नाही. जगातील सर्वात महागडे विमान शनिवार रात्रीपासून केरळच्या तिरुवनंतपुरम आंतरराष्ट्रीय विमानतळावर उभे आहे. खराब हवामान आणि इंधनाच्या कमतरतेमुळे केरळमध्ये विमानाची आपत्कालीन लँडिंग करण्यात आली होती.

हायड्रॉलिक बिघाडामुळे हे विमान मागील ४८ तासांपासून जमिनीवरच अडकले आहे. या जेटला पुन्हा एचएमएस वेल्सकडे परतावे लागणार आहे. मात्र याचा संपूर्ण घटनाक्रम अनपेक्षित राहिला. त्रिवेंद्रममध्ये एफ-३५ बी फायटर जेटची आपत्कालीन लँडिंग ही अमेरिकेच्या दाव्यांची पोलखोल करणारी ठरली आहे. अमेरिका आणि इंग्लंड यांच्याततर्फे सतत दावा केला जातो की, हे पाचव्या पिढीचे लढाऊ विमान आहे.

# वारकऱ्यांना टोलमाफी, शासन निर्णय जारी

**मुंबई (प्रतिनिधी)–** वारकऱ्यांना टोलमाफी देण्याचा निर्णय सरकारनं घेतला असून या संदर्भातील निर्णय जारी करण्यात आला आहे. १८ जून ते १० जुलै दरम्यान वारकऱ्यांना ही टोलमाफी दिली जाणार आहे. १० मानाच्या पालख्या जाणाऱ्या मार्गांवर टोलमाफीचा निर्णय घेण्यात आला आहे.

पंढरपूर वारीसाठी जाणाऱ्या वारकऱ्यांना टोल माफ करण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे. १८ जून ते १० जुलैदरम्यान पालखी मार्गावर वारकऱ्यांना टोलमाफी मिळणार आहे. १० मानाच्या पालख्या जाणाऱ्या म ार्गांवर सरकारने टोलमाफीचा निर्णय घेतला आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाकडून या संदर्भातील निर्णय जारी करण्यात आला आहे. शासनाच्या निर्णयानुसार टोल नाक्यावर वारकरी, मानाच्या पालख्या आणि भाविकांना टोलमाफी मिळणार आहे. जड आणि हलक्या वाहनांना या टोलमाफीचा फायदा होणार आहे.

दरम्यान या वारकऱ्यांना टोलमाफ करण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाकडून या संदर्भातील निर्णय जारी करण्यात आला आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या या निर्णयानुसार पंढरपूरला जाणाऱ्या वारकऱ्यांना टोलमाफी मिळणार आहे. मानाच्या पालख्या आणि भाविकांना टोलमाफी मिळणार आहे. जड आणि हलक्या वाहनांना या टोलमाफीचा फायदा होणार आहे.

# शालेय निधी व्यवहारात गैरप्रकार आढळल्यास कारवाई होणार -उदय सामंत

**मुंबई (प्रतिनिधी)–** राज्यात अनेक ठिकाणी शालेय शिक्षण विभागाचा आढावा पालकमंत्री उदय सामंत यांनी घेतला. शिक्षण क्षेत्रातील काही अधिकाऱ्यांना उदय सामंतानी चांगलंच धारेवर धरलं. जिल्हातील ५ हजार ८३० शिक्षकांपैकी किती शिक्षकांनी विद्यार्थ्यांसाठी नवीन उपक्रम राबवले आहेत ? पंतप्रधान अंतर्गत निधीतून काय काम केली? विद्यार्थ्यांची संख्या वाढवण्यासाठी कोणते उपक्रम राबवले आहेत? यासारखे अनेक प्रश्न विचारुन उदय सामंत यांनी शिक्षकांची चांगली शाळा घेतली.



तसेच उदय सामंत यांनी पत्रकारांशी देखील संवाद साधला, रत्नागिरी येथील वाडा याठिकाणी शिक्षकांने विश्रांतीगृह सुरु केले आहे. कोणत्याही विद्यार्थ्याला झोप आली. तर वडिलांप्रमाणे विद्यार्थ्याला झोपवलं जातं विद्यार्थी झोपेतून जागा झाल्यानंतर पुन्हा शिकवलं जातं. सामाजिक कार्य म्हणून ३६५ दिवस विद्यार्थ्यांना शिकवण्याचं काम शिक्षक करत असतात. तसेच काही शिक्षक विद्यार्थ्यांना बागेत खेळता यावं यासाठी बाग तयार करतात. काही शाळेतील विद्यार्थी इंग्रजी आणि मराठी एकाच वेळी लिहितात. अशा शिक्षकांचं मार्गदर्शन ठेवायला हव, अशी सुचना उदय सामंत यांनी केली. तसेच उदय सामंत यांनी पंतप्रधान योजने अंतर्गत खर्च करण्यात आलेल्या शाळांना अहवाल देखील मागवला. यामध्ये काही गैरप्रकार आढळला तर त्यांच्यावरती फौजदारी कारवाई करण्यात येणार असल्याची माहिती दिली.

## ऑनलाईन बेटिंग प्रकरणी ईडीची नजर, अनेक बड्या लोकांची चौकशी होणार




**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** भारताचे क्रिक्रेटपटू आणि बॉलिवूड मधील मोठ्या कलाकारांवर अंमलबजावणी संचालयाने (ईडी) कारवाईला सुरवात केली आहे. ईडीने काही दिवसांपूर्वीचं माजी क्रिकेटपटू युवराजी सिंग, हरभजन सिंग, सुरेश रैना, यांची चौकशी केली होती. ऑनलाईन बेटिंग प्रकरणात अभिनेता सोनू सुद, आणि उर्वशी रौतेला यांचीही चौकशी केली.

काही दिवसांपूर्वीच केंद्र सरकारने बेटिंग ॲपवर बंदी घातली होती, परंतू अनेक मोठ्या बॉलिवूड कलाकार आणि क्रिकेटर यांच्याकडून बंदी घातलेल्या प्लॅटफॉर्मला का प्रमोट केलं जातं आहे, असा सवाल ईडीने चौकशी दरम्यान केला. या संदर्भात माजी क्रिकेटपटू आणि बॉलिवूड कलाकारांवर ईडीची कारवाई केली जात आहे.

अलिकडेच, कोलकत्ता येथे अमलबजावणी संचालयाने मनी लॉर्डिंग कायद्यांतर्गत एका मोठ्या ऑनलाईन बेटिंग आणि मनी लॉर्डिंग रॅकेटचा पर्दाफाश करण्यासाठी, पश्चिम बंगालसह दिल्ली, बिहार, उत्तर प्रदेश आणि आसाममध्ये पसरलेल्या अनेक ठिकाणी शोध मोहिम राबवण्यात आली. या कारवाईदरम्यान मोठ्या प्रमाणात कागदपत्रे जप्त करण्यात आली.

या प्रकरणात ७६६ बँकेद्वारे पैशांचा व्यवहार करण्यात आला आहे, अशी माहिती सुत्रांनी दिली. त्यामुळे ईडीने १६ डेबिट आणि क्रेडिट कार्ड लॉक केलेली आहेत. अशी माहिती समोर आली. ईडीने विशाल भारद्वाज आणि सोनू ठाकूर यांना ताब्यात घेऊन न्यायालयात हजर केले होते.

# राजमाता जिजाऊ सृष्टीसाठी निधी कमी पडू देणार नाही -खा.अशोकराव चव्हाण

**नांदेड (प्रतिनिधी)–** स्वराज्य जननी राजमाता जिजाऊ सृष्टीसाठी निधी कमी पडू देणार नाही, असे प्रतिपादन महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री खा. अशोकराव चव्हाण यांनी केले. राजमाता जिजाऊ प्रतिष्ठान आयोजित अभिवादन कार्यक्रमात ते बोलत होते.

यावेळी बोलताना त्यांनी प्रतिष्ठानचे अध्यक्ष अविनाश कदम यांचे विशेष कौतुक केले. अविनाश कदम यांनी आपल्या आयुष्यातील पंचवीस वर्ष या ऐतिहासिक कार्यासाठी समर्पित केली आहेत व अशा प्रकारचे जिजाऊ सृष्टी उद्यान महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यात उभारले पाहिजे, असे गौरवोद्गार त्यांनी काढले. तत्कालीन मुख्यमंत्री व सध्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, विद्यमान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या सहकार्याने याआधी निधी उपलब्ध झाला आणि भविष्यातही उर्वरित कामासाठी निधी कमी पडू दिला जाणार नाही, असे त्यांनी स्पष्टपणे सांगितले.




कार्यक्रमात आ.आनंदराव बोंढारकर माजी मंत्री डी.पी. सावंत, माजी आ. अमरनाथ राजूरकर, सौ.संध्याताई कल्याणकर, मंगाराणी अंबुलगेकर, जयश्री पावडे, किशोर स्वामी, पंजाबराव काळे, उमेश पवळे, संतोष गव्हाणे, प्रशांत तिडके, विजय गंभीरे, दशरथ कपाटे, डॉ. विठ्ठल पावडे, कृष्णाताई मंगनाळे, सरिता बिरकले, संकेत पाटील, राजू काळे, भालचंद्र पवळे, सुनील कदम, दर्शणसिंघ सिद्धू, शीतल भालके, बालाजी इबितदार, अनिता इंगोले, गजानन मुधोळ, शुभलक्ष्मी सूर्यवंशी, उपायुक्त अजितपालसिंघ संधू, राजेश पाटील, सुभाष कोल्हे, स्वप्नील सूर्यवंशी, शिवाजी पावडे,संजय वटफळीकर, शंकर पाटील, राज सरकार, गजू सावंत, विजय देवडे, साहेबराव देबडे, दिलीप टाकळीकर, शशिकांत क्षीरसागर, दिलीपसिंघ सोडी, तुळजाराम यादव, अंबादास जोशी, आशिष नेरळकर, विनय सगर, महादेवी मठपती, शारदा कदम, आशा पावडे, मंजुषा सोळंके, गीता कदम यांच्यासह अनेक मान्यवरांची उपस्थिती होती.

आ. आनंदराव बोंढारकर यांनीही जिजाऊ सृष्टीचे महत्त्व अधोरेखित करताना सांगितले की, नांदेडमधील जिजाऊ सृष्टी उद्यान इतिहासाला उजाळा देणारे असून अतिशय सुंदर असल्याचे प्रतिपादन केले. यावेळी प्रतिष्ठानचे अध्यक्ष अविनाश कदम यांनी आपल्या प्रास्ताविकेत मंजूर करण्यात आलेल्या निधीतून समाजपयोगी उपक्रम राबवणार असल्याचे प्रतिपादन केले. यामध्ये स्पर्धा परीक्षा देणाऱ्या होतकरू विद्यार्थ्यांनीसाठी अभ्यासिका व त्यांच्यासाठी मार्गदर्शन शिबिरे आयोजन केले जाणार व इतर उपक्रम राबवणले जाणार असल्याचे सांगितले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. संदीप काळे केले. त्यांनी राजमाता जिजाऊ माँ साहेबांचे जीवनकार्य, शिवरायांच्या घडणीत त्यांचे मोलाचे योगदान, आणि आजच्या काळातील त्यांची प्रेरणा या बाबींवर मार्मिक भाष्य केले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी माँ साहेबांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. विविध सामाजिक संघटनांचे पदाधिकारी, पारंपरिक पोशाखातील महिला, तरुण शिवप्रेमींची उत्स्फूर्त उपस्थिती आणि जय जिजाऊ! जय शिवराय! च्या घोषणांनी परिसर दुमदुमून गेला.

या प्रेरणादायी कार्यक्रमाचे आयोजन राजमाता जिजाऊ प्रतिष्ठानचे अध्यक्ष अविनाश कदम यांनी केले होते. कार्यक्रमाच्या समारोपाप्रसंगी उपस्थित सर्वांनी जिजाऊ माँ साहेबांच्या विचारांचा वारसा पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचवण्याचा संकल्प केला.

**जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे**
**शहाणे करूनी सोडावे, सकळ जन**

संस्थापक संपादकः
कै. देविदासराव रसाळ

गोदातीर समाचार

**संपादक**
**केशव घोणसे पाटील**

# विमान वाहतूक नव्या टप्प्यात

नरेंद्र मोदी यांच्या प्रथम प्रधानमंत्री कार्यकाळामध्ये त्यांनी प्रत्येक जिल्ह्याला विमानतळ उभारण्याचा संकल्प हाती घेतला होता. तो अध्याय पूर्ण जरी झालेला नसला तरी त्यामध्ये बरीच प्रगती झाली आहे. बस आणि रेल्वे वाहतूक यांच्या तुलनेमध्ये विमान वाहतूक ही खूप महागडी जरी असली तरी आता काळाची ती गरज झाली आहे. केवळ प्रवासी वाहतूकच नव्हे तर माल वाहतुकीसाठी देखील याचा फार मोठा उपयोग होतो आहे. सध्या विमानतळांची आणि प्रवासी विमानांची संख्या जरी वाढली असली तरी पायाभूत सुविधा मात्र हव्या त्या प्रमाणात वाढलेल्या नाहीत. यामुळे ही विमान वाहतूक म्हणावी तेवढी सुखद झाली नाही. परंतु आपल्या देशाचे नागरी विमान वाहतूक क्षेत्र सध्या एका ऐतिहासिक टप्प्यावर उभे आहे. मागील काही वर्षांत या क्षेत्राने केवळ विस्तारच नाही, तर तंत्रज्ञान, सुरक्षा, पर्यावरणपूरकतेपासून ते रोजगारनिर्मितीपर्यंत अनेक आघाड्यांवर आपली उपस्थिती अधिक ठसवली आहे. २०४७ पर्यंत 'विकसित भारत' या ध्येयाकडे वाटचाल करत असताना, देशाच्या विमानतळांचे रुपांतर ही त्या योजनेतील एक महत्त्वाची कडी ठरत आहे. भारत आज जगातील तिसऱ्या क्रमांकाचा मोठा देशांतर्गत हवाई वाहतूक बाजार बनला आहे. देशाच्या जीडीपीमध्ये १.५ टक्के योगदान देणाऱ्या या क्षेत्रामुळे सुमारे ७७ लाख लोकांना रोजगार उपलब्ध झाला आहे. मागील दहा वर्षांत देशात ८५ नव्या विमानतळांची उभारणी झाली असून, २०४७ पर्यंत ही संख्या ३५० वर नेण्याचा स्पष्ट आराखडा केंद्र सरकारने आखला आहे. आजची विमानतळे केवळ प्रवासाची जागा राहिलेली नसून, ती एक डिजिटल अनुभव देणारी केंद्रे बनत आहेत. चेहरा ओळखण्याची प्रणाली, बायोमेट्रिक तपासणी, एआयवर आधारित सुरक्षा प्रक्रिया यामुळे प्रवासी तपासणीसाठी लागणारा वेळ तब्बल ३० ते ४० टक्क्यांनी कमी होईल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे. यातून प्रवाशांचा अनुभव सुकर होण्याबरोबरच सुरक्षेचंही अधिक काटेकोर व्यवस्थापन शक्य होणार आहे. एकूणच आरएफआयडी, कृत्रिम बुद्धिमत्ता, मशीन लर्निंग आणि स्मार्ट डेटा प्रणालींच्या वापरामुळे भारताचं विमान वाहतूक क्षेत्र पारंपरिक पद्धतींपासून दूर जाऊन बुद्धिमान व्यवस्थापनाकडे वाटचाल करत आहे. सध्याचे 'ग्रीनफील्ड' प्रकल्प म्हणजे पूर्णतः नव्याने उभारले जाणारे विमानतळ हे नावीन्याच्या प्रयोगांसाठी मोकळं क्षेत्र आहे. याउलट, जुन्या 'ब्राऊनफील्ड' ठिकाणी आधुनिकतेच्या अंमलबजावणीत अडचणी येऊ शकतात. त्यामुळे डिजीटल फर्स्ट संकल्पना, मॉड्युलर कन्स्ट्रक्शन, ऊर्जा व्यवस्थापन आणि प्रवासी केंद्रीत नियोजन या बाबी भविष्यातील विमानतळांच्या आराखड्यात आवश्यक असतील. पर्यावरणीय बदल, वृद्ध होत चाललेली लोकसंख्या, डिजिटल संक्रमण आणि उच्च-वापर व विश्रांतीसाठी योग्य जागा यांचा समतोल राखणारी विमानतळ रचना ही काळाची गरज आहे. त्याचबरोबर खासगी गुंतवणूक आकर्षित करणारी आणि स्थानिक गरजांशी सुसंगत अशी आर्थिक धोरणं राबवली गेल्यास, हे भविष्य वास्तवात उतरणं सहज शक्य आहे. वाढत्या डिजीटल प्रणालींसोबत सायबर सुरक्षेच्या धोका देखील वाढतो आहे. म्हणूनच हवाई वाहतूक क्षेत्रात डिजिटल इकोसिस्टम अधिक बळकट करणं अत्यंत आवश्यक ठरत आहे. यासाठी केंद्र आणि राज्य सरकारांनी, तज्ज्ञ संस्था आणि खाजगी भागीदारांनी एकत्रितपणे सायबर सुरक्षेचे आराखडे तयार करायला हवेत. यामुळे भारत केवळ प्रवासी वाहतुकीचं केंद्र न राहता, संपूर्ण हवाई वाहतूक सेवांचं एक आत्मनिर्भर हब बनू शकतो. विमान वाहतूक क्षेत्र वाढत असताना एक गंभीर आव्हान पुढे येतं. ते म्हणजे मनुष्यबळाची कमतरता. पायलट प्रशिक्षणातील पात्रता अलीकडच्या काळात वाढवण्यात आली असली तरी, केबिन क्रू आणि ग्राउंड स्टाफ यांचं प्रशिक्षण फारसं विस्तारलेलं नाही. ही जबाबदारी केवळ एअरलाईन कंपन्यांवर न ठेवता, विद्यापीठे, खाजगी संस्था आणि स्किल डेव्हलपमेंट यंत्रणांमार्फतही द्यायला हवी. भारता-समोर संधी आहे की तो एक जागतिक प्रशिक्षण केंद्र बनू शकेल आणि स्थानिकच नव्हे, तर आंतरराष्ट्रीय हवाई उद्योगाला सुद्धा सक्षम मनुष्यबळ पुरवू शकेल. आज भारतात केवळ १० टक्क्यांहून कमी लोक विमानप्रवास करतात. मात्र भविष्यात, वाढती मध्यमवर्गीय लोकसंख्या, वेगवान शहरीकरण, आणि प्रवासाच्या गरजा लक्षात घेता, विमानवाहतुकीत प्रचंड वाढ अपेक्षित आहे. ही वाढ हाताळण्यासाठी विमानतळ व्यवस्थापन, तांत्रिक नवकल्पना आणि स्वयंपूर्ण धोरणे तयार ठेवावी लागतील. २०४७ मध्ये भारताच्या स्वातंत्र्याचा शतकोत्सव साजरा होत असताना, आपलं हवाई क्षेत्र देखील तेवढंच सशक्त, जागतिक स्तरावर प्रभावी आणि प्रवाशांच्या गरजा लक्षात घेणारं असावं, हीच अपेक्षा.

# चांगले कर्म व चांगले विचारच उन्नतीचा मार्ग



खून...खून म्हणजे केवळ माणसाचीच हत्या नाही तर या प्रकारात पशूपक्षांचीही हत्या असा याचा अर्थ काढता येईल. पशूपक्षांची हत्या? हा काय विचित्र प्रकार आहे. असा प्रश्न कोणालाही अगदी सहज पडू शकतो. परंतु तो प्रश्न वास्तविक प्रश्न आहे. कारण पशूपक्षांनाही जीव असतो आणि त्यांचीही हत्या केली तरी त्याचेही गंभीर परिणाम आपल्याला भोगावेच लागतात. ज्याला कोणत्याच स्वरुपाचं प्रायश्चित नाही. म्हणूनच जो कोणी मुक्या प्राणीमात्रांचीही हत्या करीत असतील. तो कधीच सुखी राहात नाही. हं, शरीरानं धडधाकट असलं म्हणजे सुख नसतंच. सुख असतं त्या माणसाचं आनंदी असण्यात. त्या माणसाच्या आनंदी वागण्यात. जर त्या व्यक्तीला आनंदी वागता येत नसेल वा आनंदानं जगता येत नसेल तर त्याच्यासारखा दुःखी माणूस जगात नाही. हे तेवढंच खरं. म्हणूनच माणसानं कोणाचाही खून करू नये. मग ते प्राणीमात्रा काही असेना. कारण प्राणीमात्रातही सृष्टीचे महत्वाचे घटकच आहेत.

सध्याच्या काळात गुन्हेगारी वृत्ती वाढत आहे. कोणी मद्यधुंद होवून वाहन चालवून रस्त्यावर झोपलेल्यांचा बळी घेतात तर कोणी अनेकांचा खून करीत सुटतात. कोणी आपल्या मुलीचा गळा घोटतात तर कोणी आपल्या मायबापांचा जीव घेतात. याला जबाबदार कोण? याला जबाबदार आहेत पोलीस की जनता? असा प्रश्न सामान्य माणसांनाही अगदी सहज पडल्याशिवाय राहात नाही. कारण दोघांचीही भूमिका ही संशयास्पदच असते.

कधी कधी जेव्हा खून होतो, तेव्हा त्या खुनाच्या बाबतीत काही लोकं म्हणतात की, काही बोलू नये यावर. खून झालाच नसता. परंतु पोलीस उशिरा पोहोचले ना. मग खून होणारच.

खुनाच्या बाबतीत सांगायचं झाल्यास खून होणारच. कारण पोलीस पोहोचले नाहीत. जर पोलीस पोहोचले असते तर खून झाला नसता काय? खून झालाच असता, जरी पोलीस उपस्थित असते तरीही. कारण ते थांबवू शकले नसते खून करणाऱ्यांना. त्याचं कारण असतं भीती. पोलीसही काही देवाचे बाप नाहीत की ते आपला जीव धोक्यात घालतील. त्यांनाही भीती असते की जर ते आडवे झाले व त्यांनी खून थांबविण्याचा प्रयत्न केलाच तर संबंधित खून करणारा व्यक्ती त्या पोलिसांचाही जीव घेईलच ही गोष्ट नाकारता येत नाही. याउलट कधीकधी नव्हे तर एखाद्या वेळेसच चमत्कार घडतो व पोलीस दिसताच खुन करणारी माणसं पळून जाऊन अनर्थ टळतो.

पोलिसांची भूमिका नेहमीच संदिग्ध राहिलेली आहे. त्याला कारणीभूत असतात काही पोलीस मंडळी. त्या पोलीस मंडळींनी जर आपली ड्युटी इमानेइतबारे बजावली तर गुन्ह्यांची संख्या निश्चीतच कमी होईल. परंतु ते तपास जेव्हा करायला सुरुवात करतात, तेव्हा वेळ निघून गेलेली असते. ज्यातून गुन्हेगार हा अगदी सहजरित्या वाचत असतो. तो मोकळा सुटत असतो. ज्याची परियंती त्या गुन्हेगाराची हिंमत वाढते व तो दुसरा गुन्हा करण्यास मोकळा होतो. परंतु म्हणतात ना. कितीही सराईत गुन्हेगार असला तरी तो एक ना एक दिवस जाळ्यात सापडतोच पोलिसांच्या आणि पोलिसांच्या जाळ्यात नाही सापडला तर विधात्यांच्या जाळ्यात तो नक्कीच सापडतो हे तेवढंच खरं. याबाबतीत एक प्रसंग सांगतो.

एक शाळा व त्या शाळेतील मुख्याध्यापक रोजच अत्याचार करायचा आपल्या कनिष्ठ असलेल्या कर्मचाऱ्यांवर. अशातच तो धमक्या देवून देण वसूल करायचा शाळेतून. देण म्हणून वसूल करीत असलेला पैसा एखाद्या शिक्षकानं देण्यास नकार दिल्यास त्याचे वेतनही बंद करायचा तो कायमस्वरुपानं. यावर संबंधित शिक्षक पोलीस ठाण्यात गेल्यास पोलिसांना सेटींग करून संबंधित शिक्षकांनाच वेठीस धरण्यास सांगायचा तो. त्यानंतर शिक्षकानं न्यायालयात जाब मागितल्यास न्यायालयातूनही क्लीनचीट मिळायची त्याला. ज्यातून अख्खे वेतन बुडायचे शिक्षकाचे. यातूनच त्याची हिंमत वाढली. त्याच्या या अत्याचारानं कित्येक शिक्षकाच्या नोकऱ्या गेल्या. परंतु मुख्याध्यापक जो की तो राहिला. तसा मुख्याध्यापक विद्यार्थ्यांकडूनही बराच पैसा खायचा. त्यांना येत असलेल्या खिचडीतून पैसा खायचा. यातूनच त्याचं आर्थिक उत्पन्न बरंच वाढलं होतं व तो गर्भश्रीमंत बनला होता. त्याच श्रीमंतीचा त्याला अतीव गर्वही चढला होता. मात्र त्याचे शिक्षकांवर होत असलेले अत्याचार व त्याचे विद्यार्थ्यांप्रती व पालकांप्रती वागणे, नियती पाहात होती. ती बोलत नव्हती आणि त्याच नियतीला बोलताही येत नव्हतं. अशातच एक दिवस असाही उजळला.

तो एक दिवस. त्या दिवशी तो सकाळीच आपल्या टूर व्हिलरनं फिरायला निघाला व वाटेतच एक सुक्ष्म अपघात झाला. ज्यात त्याला गंभीर लागलेलं जाणवत नव्हतं. परंतु मेंदूला मार लागला होता. ज्यात तो जागीच मरण पावला. महत्व पूर्ण बाब ही की आपण जसे कर्म करतो. त्याची शिक्षा आपल्याला मिळतेच. प्रसंगी थोडा वेळ लागतो. म्हणूनच चांगले कर्म करावे.

कधीकधी पोलिसांच्या संशयाच्या भूमिकेमुळे गुन्हेगार सुटतात. मग ते अव्वल दर्जाचे गुन्हेगार बनतात. परंतु नियती त्यांना सोडत असते काय? जे दुसऱ्याचा खून जरी करुन मोकळे सुटत असले तरी ते नियतीच्या कचाट्यातून सुटत नाहीत. त्या खुनाऱ्यांच्या घरात एवढे सारे विघ्न येतात की, त्याचं जगणं कठीण होवून बसतं. कधी गंभीर आजार तर कधी त्यांच्या स्वतःच्या मुलांचं घरातून पळून जाणं वा मरणं वा सोडून जाणं. कधी पैशाची अडचण. कधी विवाह न जुळणे, कधी घरात जास्तीचा लठ्ठपणा. कधी मरणासन्न यातना. कधी मधूमेह तर कधी हाय ब्लडप्रेशर अन् लोकं आपल्यावर आलेल्या यातना सहन करु शकतात. परंतु जेव्हा त्यांच्या मुलांचे गंभीर हाल होतात. ते मात्र कोणीही सहन करु शकत नाही. अशा गोष्टीचा आपल्याला भयंकर त्रास होतो. त्यावेळेस आपल्याला विधाता आठवतो आणि आपण रोज विधात्याला आळवत बसतो. कधी प्रचंड स्वरुपाची पूजापाठ तर कधी नदीत अभंग स्नान करणं, विचार करतोय की नदीत अभंग स्नान केल्यानं आपलं पाप खंडित होईल. परंतु जसा एखाद्या कपड्यावरचा डाग धुतला जात नाही. तसंच हे आपलं पाप असतं. गुन्हेगारीचं पाप. त्या पापाची ना नदीत अंघोळ केल्यानं सुटका होत ना कोणत्या देवालयात गेल्यानं. जरी त्या पापाला पोलिसांकडून न्याय मिळाला नसेल तरीही त्या गुन्ह्याला शिक्षा देण्याचं काम नियती करतेच करते. म्हणूनच कोणतंही पाप का असेना, ते करूच नये. जरी एखाद्या सुक्ष्मातीत सुक्ष्म जीव मारण्याचं पाप का असेना. तेही जीव मारणं हे पापच असते आणि नियती त्याचीही शिक्षाही देतच असते. विशेष म्हणजे गुन्हे घडत जरी असले तरी त्याला थांबवायची ताकद ही पोलीस व जनतेमध्ये आहे आणि तेही सक्षमपणे काम करीत नसतील तर नियती त्यावर अतिशय सक्षमपणे काम करीत असते. ती ज्याच्या-त्याच्या कर्माची शिक्षा त्याला त्या स्वरुपात देत असते. मग आपण कितीही पूजापाठ केली वा कितीही वेळा अभंग स्नान केले तरीही आपण नियतीच्या कचाट्यातून कधीही सुटू शकत नाही. म्हणूनच कोणतंही पाप करण्यापूर्वी सतरावेळा विचार करावा. मगच पाप करावं हे तेवढंच खरं.

**-अंकुश शिंगाडे**
नागपूर
मो. ९३७३३५९४५०

# चला, सहलीला जाऊया!

आज आपण याच आंतरराष्ट्रीय सहल दिवसाविषयी अधिक सविस्तरपणे माहिती जाणून घेणार आहोत. ज्यात आंतरराष्ट्रीय सहल दिवस कधी आणि केव्हा साजरा केला जातो? कशा पद्धतीने साजरा केला जातो? का साजरा केला जातो? हा दिवस साजरा करण्यामागचा मूळ इतिहास काय आहे? इत्यादी महत्वाच्या बाबींचा आढावा घेणार आहोत.

सहल म्हटले की, पहिले आपल्याला आपले शाळेचे दिवस आठवतात, कारण लहान असताना नेहमी आपल्या शाळेची कुठेतरी ऐतिहासिक तसेच निसर्गरम्य स्थळी सहल जायची. त्यामुळे सहल ही आपणांस लहानपणापासूनच माहीत आहे. पण आता सहल ही शाळेत जात असलेल्या लहान मुलांपुरतीच सीमित राहिलेली नाहीय, तर लहानांपासून मोठ्यांपर्यत सगळ्यांचीच आवडती गोष्ट झाली आहे. आपल्या कुटुंबासोबत वेळ व्यतीत करण्याचे हे एक उत्तम साधन तसेच माध्यम बनले आहे.

आंतरराष्ट्रीय सहल दिवस हा दरवर्षी १८ जून रोजी साजरा केला जात असतो. दरवर्षी आंतरराष्ट्रीय सहल दिवस साजरा करण्याचे मुख्य उद्दिष्ट म्हणजे रोजच्या धकाधकीच्या जीवनातून वेळ काढून आपण प्रत्येक व्यक्तीने आपल्या फॅमिलीसोबत एक चांगला वेळ व्यतीत करायला हवा. त्यांच्यासोबत बाहेर एखाद्या निसर्गरम्य ठिकाणी सहलीला जायला हवे. त्यांना आपण आपल्या कामातून सवड काढून वेळ द्यावा, त्यांच्याशी संवाद साधावा, हेच समजावून सांगण्यासाठी आणि आपणांस आपल्या जीवनातील सहलीचे महत्त्व पटवून देण्यासाठी हा दिवस आंतरराष्ट्रीय पातळीवर साजरा करण्यात येतो.



आंतरराष्ट्रीय सहल दिनाच्या दिवशी सर्व फॅमिली, मित्र, मैत्रीणी जमतात आणि निसर्गाच्या सान्निध्यात किंवा एखाद्या आपल्या आवडत्या पर्यटनस्थळी जातात. तेथे पर्यटनाचा आनंद घेतात. मनावरील ताणतणाव येथे झटकून मन हलके केले जाते. तंबू गाडून तेथे पिकनिकचा आनंद साजरा करतात किंवा याच दिवशी लहान मुले गार्डनमध्ये जाऊन खेळतात. स्विमिंग पूलमध्ये स्वीमिंग करतात. खूप खेळता, बागडता गप्पा-गोष्टी करतात. बाहेरगावी एखाद्या पाहण्याजोग्या स्थळी ट्रिपला जातात. तर मोठी माणसे याचदिवशी एखाद्या धार्मिक देवस्थानाला भेट देतात. शाळेत देखील हा दिवस एखाद्या सुट्टीप्रमाणे साजरा केला जातो. या दिवशी सर्व शिक्षक आपल्या विद्यार्थ्यांना घेऊन एखाद्या बगीचात जातात किंवा एखाद्या समुद्रकिनारी, निसर्गसौंदर्य असलेल्या किंवा ऐतिहासिक स्थळी जातात. तेथील ज्ञानवर्धक माहिती टिपून घेतात.

आंतरराष्ट्रीय सहल दिवसाचा इतिहास असा कथन केला जातो- आंतरराष्ट्रीय सहल दिवस हा फ्रान्स या देशात एकोणिसाव्या शतका-मध्ये सर्वप्रथम साजरा केला गेला. तेव्हापासून दरवर्षी १८ जून रोजीच हा दिवस साजरा करण्यात येत आहे. आंतरराष्ट्रीय सहल दिवस सगळ्यात प्रथम फ्रान्स देशात साजरा करण्यात आला होता. या दिवशी इथे राहणारे लोक निसर्गाचे सान्निध्य असलेल्या समुद्राकाठी एखाद्या शांत-निरव ठिकाणी जातात आणि आपल्या कुटुंबासोबत आनंदाने वेळ व्यक्तीत करतात. सोबतच चीज, ब्रेड, फ्रुटस तसेच वाईन इत्यादींचा आनंद देखील घेतात. अशा ठिकाणी मादक पदार्थांचे सेवन करून मौजमस्ती करणे टाळले पाहिजे. ही अवस्था प्राणघातक ठरू शकते. पिकनिक डे साजरा करणे हे फ्रान्स या देशात फ्रेंच राज्यक्रांतीचा शेवट झाल्यानंतर सुरू झाले. फ्रेंच राज्यक्रांती संपुष्टात आल्यानंतर पहिल्यांदाच येथील जनतेसाठी रॉयल नावाचे गार्डन सुरू करण्यात आले. त्यानंतर फ्रेंच देशातील लोक आपल्या फॅमिलीसोबत येऊन वेळ व्यतीत करू लागले. घरून स्वयंपाक तयार करुन गार्डनमध्ये जाऊन गप्पागोष्टी करत खाऊ पिऊ लागले. तेव्हापासून ही तेथील प्रथाच बनून गेली. पण आता हाच दिवस फ्रान्स व्यतिरिक्त संपूर्ण जग देखील हळूहळू मान्य करू लागला आहे. म्हणूनच भारत देशात तसेच जगभरात दरवर्षी १८ जून रोजी हा दिवस आंतरराष्ट्रीय पातळीवर साजरा केला जाऊ लागला आहे.

इंटरनॅशनल पिकनिक डेला मराठीत आंतरराष्ट्रीय पातळीवर साजरा केला जाणारा सहलीचा दिवस म्हणून संबोधिले जाते.

भारत देशात मागील तीन वर्षांपासून कोरोनाचा जीवघेण्या भस्मासुराचा थयथयाट सुरू आहे. त्यामुळे एकमेकांत शारीरिक अंतर पाळणे महत्त्वाचे झाले आहे. अशा पर्यटनस्थळी, सार्वजनिक ठिकाणी गर्दी करणे लाभदायक ठरत नाही. म्हणून सद्यातरी या ज्ञानवर्धक जागतिक सहल दिनी पर्यटन सावधगिरीने पार पाडणेच इष्ट राहील.

यानिमित्ताने गर्दी करणे टाळा, मास्कचा वापर करा, शारीरिक अंतर पाळा व वेळोवेळी हात सॅनिटायझर्ड करा !!

**-कृ. गो. निकोडे**
गडचिरोली,
मो. ९४२३७१४८८३

# फ्लाईंग शीख मिल्खा सिंग!



भारतातीलच नव्हे तर जगातील महान धावपटूत ज्यांची गणना होते असे भारताचे महान धावपटू फ्लाईंग शीख मिल्खा सिंग यांचा आज स्मृतिदिन. १८ जून २०२१ रोजी मिल्खा सिंग यांचे निधन झाले होते. फ्लाईंग शीख अशी उपाधी मिळालेल्या मिल्खा सिंग यांचा जन्म २० नोव्हेंबर १९२९ रोजी पंजाबातील गोविंदपुरा या गावी एका गरीब शीख कुटुंबात झाला. मिल्खा सिंग यांना लहानपणापासून धावण्याची खूप आवड होती.

राष्ट्रीय पातळीवरील धावण्याच्या अनेक स्पर्धांमध्ये त्यांनी यश मिळवले मात्र मिल्खा सिंग प्रकाशझोतात आले ते १९५८ साली. यावर्षी कार्डिफ येथे झालेल्या राष्ट्रकुल स्पर्धेत त्यांनी ४०० मीटरच्या शर्यतीत सुवर्णपदक मिळवले. मिल्खा सिंग हे राष्ट्रकुल स्पर्धेत वैयक्तिक प्रकारात सुवर्णपदक जिंकणारे स्वतंत्र भारतातील पहिले खेळाडू होते. त्यानंतर १९५८ च्या टोकियो येथे झालेल्या आशिआई स्पर्धेत मिल्खा सिंग यांनी २०० आणि ४०० मीटर शर्यतीत सुवर्णपदक मिळवले. एकाच आतंरराष्ट्रीय स्पर्धेत दोन सुवर्णपदक मिळवण-रे ते भारताचे पहिले खेळाडू आहेत. १९६२ च्या जकार्ता आशिआई स्पर्धेतही त्यांनी ४०० मीटर आणि ४ बाय ४०० मीटर रिले शर्यतीत सुवर्णपदक मिळवले.

१९६० च्या रोम ऑलम्पिक स्पर्धेत मिल्खा सिंग यांचे पदक अतिशय सूक्ष्म फरकाने हुकले. या ऑलिम्पिकमध्ये मिल्खा सिंग यांनी ४०० मीटर शर्यत ४५. ७३ सेकंदामध्ये पूर्ण केली. जर्मनीचा धावपटू कार्ल कुफमॅनपेक्षा ते सेकंदाच्या १०० व्या भाग एव्हढ्या कमी फरकाने मागे राहिले. अतिशय सूक्ष्म फरकाने ऑलिम्पिक पदक हुकल्याने जगभरातील क्रीडाप्रेमींनी हळहळ व्यक्त केली. त्यांचे ऑलिम्पिक पदक हुकले तरी त्यांनी शर्यत पूर्ण केलेली ही वेळ राष्ट्रीय विक्रम ठरली विशेष म्हणजे त्यांचा हा राष्ट्रीय विक्रम ४० वर्ष अबाधित होता. याच स्पर्धेदरम्यान त्यांची भारतीय महिला व्हॉलीबॉल संघाच्या कर्णधार निर्मल कौर यांच्याशी ओळख झाली. ओळखीचे रूपांतर प्रेमात झाले आणि त्यांनी विवाह केला.

२०२१ सालीच त्यांच्या पत्नीचे कोरोनाने निधन झाले. त्यांचे पुत्र जीव मिल्खा सिंग हे प्रसिद्ध गोल्फपटु आहेत. मिल्खा सिंग यांना फ्लाईंग शीख ही उपाधी पाकिस्तानचे माजी राष्ट्राध्यक्ष जनरल आयुब खान यांनी दिली. १९६० साली पाकिस्तानचा पाकिस्तानचा जगप्रसिद्ध धावपटू अब्दुल खालीक याने आव्हानदिले. मिल्खासिंगयांनीत्यालापाकिस्तानमध्ये जाऊन हरवले. ते या स्पर्धेत ज्या प्रकारे धावले ते पाहून पाकिस्तानमध्येही ते खूप लोकप्रिय झाले. ही स्पर्धा पाहण्यासाठी जनरल आयुब खान स्वतः हजर होते. या स्पर्धेनंतरच जनरल आयुब खान यांनी त्यांना फ्लाईंग शीख ही उपाधी दिली.

भारत सरकाररनेही त्यांना अर्जुन व पद्मश्री पुरस्कार देऊन त्यांचा योग्य गौरव केला. त्यांच्या जीवनावर आधारित भाग मिल्खा भाग हा चित्रपट येऊन गेला. या चित्रपटात फरहान अख्तर यांनी मिल्खा सिंग यांची भूमिका केली होती. मिल्खा सिंग हे भारतातीलच नाही तर जगभरातील धावपटूंचा आदर्श होते. निवृत्तीनंतर त्यांनी तरुण धावपटूंना मार्गदर्शनही केले. मिल्खा सिंग यांचे चार वर्षापूर्वी १८ जून २०२१ रोजी कोरोनाने निधन झाले. त्यांच्या निधनाने भारतीय क्रीडा क्षेत्राची मोठी हानी झाली. फ्लाईंग शीख मिल्खा सिंग यांना स्मृतिदिनी विनम्र अभिवादन!

**-श्याम ठाणेदार**
दौंड, जि. पुणे
मो. ९९२२५४६२९५

# राज्यात रखडलेल्या मान्सूनचा प्रवास परत सुरू



**मुंबई**-अठरा दिवसांच्या विश्रांतीनंतर १६ जूनपासून राज्यात मान्सूनचा प्रवास परत सुरु झाला आहे. गेल्या २४ तासात मुंबईसह कोकणात मुसळधार पाऊस पडलेला आहे, तर मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि पश्चिम विदर्भातील काही भागात मध्यम स्वरूपाचा पाऊस पडला आहे. तुलनेत पूर्व विदर्भातील काही भागातच हलका ते मध्यम स्वरूपाचा पाऊस पडला आहे, आणि उर्वरित विदर्भात हवामान प्रामुख्याने कोरडे होते.

१ ते १६ जून दरम्यान कोकण आणि गोवा उपविभागात सरासरीच्या २२ टक्के अधिक पाऊस पडला आहे, तर मध्य महाराष्ट्रात सरासरीपेक्षा एक टक्का कमी, मराठवाड्यात २६ टक्के कमी, आणि विदर्भात ६१ टक्के कमी पाऊस पडला आहे. राज्यातील १३४ तालुक्यांमध्ये एकूण पाऊस ६५ मिलीमीटर हून अधिक पडला आहे आणि ८४ तालुक्यांमध्ये सरासरी ते सरासरीहून अधिक पाऊस पडला आहे. भंडारा, गोंदिया, नागपूर, यवतमाळ, वर्धा, चंद्रपूर, गडचिरोली, अमरावती, हिंगोली, आणि बीड जिल्ह्यांसह खानदेशातील काही तालुक्यांमध्ये पावसाची घट लक्षणीय आहे.

२२ जूनपर्यंत कोकण आणि पश्चिम महाराष्ट्रातील घाट परिसरात चांगल्या पावसाची शक्यता आहे, तर मध्य महाराष्ट्र, पश्चिम विदर्भ आणि मराठवाड्यात विखुरलेल्या स्वरूपाचा पाऊस अपेक्षित आहे. दक्षिण मराठवाड्यात पावसाचे प्रमाण कमी राहणार असल्याची शक्यता आहे. या भागांपेक्षा पूर्व विदर्भात पावसा-चे प्रमाण थोडे अधिक राहू शकते. या सर्वच भागांमध्ये २२ तारखेपर्यंत मुसळधार किंवा अति मुसळधार पावसाची शक्यता नाही.

अद्यापि ज्या भागांमध्ये चांगला पाऊस पडलेला नाही (प्रामुख्याने विदर्भात) त्या भागातील कोरडवाहू शेतकऱ्यांनी जमिनीत पुरेसा ओलावा असल्याशिवाय पेरणी आणि लागवडीची घाई करू नये, असे आवाहन कृषी विभागाकडून करण्यात येत आहे.

निरोगी आरोग्याचा कानमंत्र

# निरामय

## वाढेल काय हो उंची?

**उंची वाढविण्याच्या विविध जाहिराती आपण बस, रेल्वेस्थानकांवर बघतो. माणसाला नेहमीच चांगले दिसण्याचे, उंच असल्याचे आकर्षण आहे. त्यामुळे त्याच्याशी निगडित विविध व्यावसायिकांची गजबज वाढणे स्वाभाविक आहे. प्रत्यक्षात माणसाची उंची ही हाडांच्या लांबीवर अवलंबून असते. हाडांची लांबी जितकी जास्त, तितकी उंची जास्त. हाडांची लांबी कमी असेल, तर उंचीही कमी असते. बाळाच्या हाडांची लांबी ही बाळ गर्भाशयात असतानाच जेव्हा गुणसूत्रे तयार होतात, तेव्हाच ठरलेली असते. आपला रंग, स्वभाव, नाकाची ठेवण, डोळ्यांचा रंग व रचना आदी आपले जेनस निर्धारित करतात. आई- वडिलांची उंची जास्त असल्यास सहसा बाळाचीही उंची जास्त असते. पण कधीकधी गुणसूत्रांच्या निर्मितीवर काही नैसर्गिक घटकांच्या प्रभावामुळे गुणसूत्रे थोडी वेगळी बनतात. त्यामुळे बाळाच्या शरीररचनेत वेगळेपणा येतो. याला 'सिंड्रोमिक बेबी' म्हणजे सर्वसामान्यांपेक्षा वेगळे मूल असे संबोधले जाते.**



सिंड्रोम विविध प्रकारचे असतात. हाडांच्या लांबीवर फरक पाडणाऱ्या आजारांना 'स्केलेटल डीस्प्लेसिया' म्हणतात. प्रामुख्याने अकाँड्रोप्लेसिया हा सर्वांत जास्त आढळणारा आजार आहे. सर्कसमधील विदूषकाची भूमिका करणारे ठेंगणे व्यक्ती आठवा. त्यांना अकाँड्रोप्लेसिया असतो. प्रगत देशांत स्केलेटल डीस्प्लेसियाची व्यक्ती इतर व्यक्तींसारखे मुख्य प्रवाहात येऊन धडाडीने काम करताना दिसते. पण आपल्या देशात सामाजिक मानसिकतेमुळे ठेंगण्या व्यक्तींना सर्कसमध्ये विदूषकाची भूमिका करावी लागते, ही शोकांतिका आहे. जन्मतः गुणसूत्रांच्या बनावटीनंतर उंची खुंटण्याची महत्त्वाची कारणे म्हणजे, मेटॅबोलिक /ग्रोथ डिसऑर्डर्स. या आजारांमधे हाडांची लांबी वाढविण्यासाठी आवश्यक असलेले घटक म्हणजे कॅल्शियम किंवा ग्रोथ हार्मोन्सची कमतरता असते. त्यामुळे उंची खुंटते. आहार सकस नसल्यास, व्हिटामिन डीची कमतरता असल्यास रिकेट्सचा आजार होतो, हाडे वाकडी होतात. जास्त काळ ही कमतरता राहिल्यास शरीराची वाढ खुंटून उंची कमी राहते. पाठीच्या कण्याचे आजारही उंची खुंटण्यास कारण ठरतात. यात पाठीच्या मणक्यांची हाडे तिरपी असतात. त्यामुळे कणा वाकून उंची खुंटते.

### उपचारांचं काय?

- उपचारांबाबत बोलायचे झाल्यास, ज्या आजारांमध्ये ग्रोथ हार्मोन्सची कमतरता असते, त्यासाठी डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार ग्रोथ हार्मोन्स दिले जातात. पण, ही औषधे डॉक्टरांच्या सल्ल्यानेच घ्यावीत. कारण जास्त प्रमाणात घेतल्यास ती शरीराला हानिकारक ठरू शकतात. या आजाराचे प्रमाण अतिशय कमी आहे. जास्त प्रमाणात आढळणारे स्केलेटल डीस्प्लेसिया किंवा सिंड्रोम्स या आजारांवर कुठलेही औषध नाही. कारण, ते जेनसच्या बदलांमुळे झाले असतात.
- जसे आपण आपला रंग, डोळ्यांची किंवा नाकाची ठेवण बदलू शकत नाही, तसे जेनेटिक डिफेक्टसमुळे निर्माण झालेल्या कमी उंचीवर कुठेलच औषध नाही. एक हात किंवा पाय आखूड असल्यास 'इलीजारोव्ह' या रशियन पद्धतीने किंवा अन्य आधुनिक ऑपरेशनने त्या हाताची, पायाची लांबी वाढवली जाते. बाळाचा आहार योग्य असणे, त्यांना रिकेट्सपासून वाचविणे, योग्य व्यायाम आवश्यक आहे. व्यायामामुळे हाडांच्या वाढींना मदतच मिळते.
- कुठलाही एक खेळ वाढीला मदत करतो, असे नाही. बारला लटकल्यामुळे उंची वाढते, हा समजही चुकीचा आहे. सगळेच मैदानी खेळ हे मुलांच्या विकासाला हातभार लावतात. मुलांचा आहार, व्यायाम योग्य ठेवा. कुठल्याही जाहिरातींना बळी पडून भलतेच उपचार करू नका. चुकीच्या औषधांमुळे, उपचारांमुळे मुलाची उंची तर वाढत नाहीच, पण शरीरातील मुख्य अवयवांना कायमस्वरूपी गंभीर इजा होऊ शकते. सामान्य मुलाची उंची येनकेन प्रकारे वाढविण्याची गरज नाही, तर समाजाची मानसिकता बदलायची जास्त गरज आहे.

## किरकोळ कारणांमुळे मुलांच्या उंचीत अडथळा!




**अनेक पालकांची तक्रार असते की त्यांच्या मुलांची उंची वाढतच नाही, त्यांना भीती असते की आपले मूल मोठे झाल्यावर बुटके तर राहणार नाही ना? कारण अशा मुलांची उंची ही इतर सामान्य मुलांच्या उंचीपेक्षा कमी असते. सध्या तर मुलांची उंची अजिबात न वाढणे किंवा खूप कमी वेगाने वाढणे यांसारख्या समस्या जास्त दिसून येत आहेत. पालक थेट डॉक्टरांकडे जाऊन याबद्दल सल्ला विचारत आहेत. कमी उंची असल्यास मुलांच्या मनात आत्मविश्वासाची कमतरता निर्माण होऊ शकते. त्यामुळे पालकांना आणि त्या मुलांना सुद्धा चिंता वाटणे साहजिक आहे! मुलाच्या योग्य मानसिक विकासासाठी योग्य शारीरिक विकास होणे सुद्धा गरजेचे आहे. मात्र जर तुमच्या मुलाची उंची वाढत नसेल तर लक्ष द्या की त्यामागे नेमके कारण काय आहे. कारण कळले की तुम्ही स्वतःहून मुलाच्या खुंटलेल्या उंचीवर उपाय शोधू शकता. आज आपण जाणून घेऊया की मुलांची उंची न वाढण्यामागे कारणे काय आहेत...**

- कॅलरीजची कमतरता : ९० टक्के मुलांची शारीरिक वाढ ही योग्य प्रमाणात कॅलरी न घेतल्यानेच थांबते. जेव्हा मूल योग्य आहार घेत नाही, पौष्टिक पदार्थ खायला कुरकुर करते तेव्हा त्याचा थेट परिणाम त्याच्या उंचीवर होत असतो. पालकांना सुद्धा याबद्दल जास्त माहिती नसते. आपल्या मुलाला किती कॅलरी मिळायला हवी याबाबतीत अज्ञान असल्याने साहजिकच त्याचा परिणाम शारीरिक वाढीवर दिसून येतो. ॲक्टीव्ह आणि निरोगी असणाऱ्या मुलांनी सुद्धा खाण्याबाबतीत असे दुर्लक्ष केले तर उंची न वाढण्याची समस्या त्यांना सुद्धा सतावू शकते. अनेक वेळा मुळे आपण जास्त जाड होऊ नये म्हणून सुद्धा कमी आहार घेतात. एकंदरीत कमी कॅलरी कमी उंचीला कारणीभूत ठरते.
- पेंक्रीयाटिक प्रॉब्लेम : अग्नाशय म्हणजेच पेंक्रियाजची अन्न पचवण्याची क्षमता खराब असल्याने सुद्धा मुलाचे वजन आणि उंची वाढत नाही असे जाणकार सांगतात. सीलिएक डिजीज किंवा क्रोन डिजीजसारख्या गेस्ट्राइंटेस्टाइनल विकारांच्या कारणाने सुद्धा मुलांच्या उंचीवर प्रभाव पडू शकतो. थायराइड वा ग्रोथ हार्मोन्सच्या कमतरतेमुळे सुद्धा मुलाची उंची वाढणे खुंटू शकते. ही एक शरीरातील समस्या असून यावर तज्ञांचा आणि डॉक्टरांचा योग्य सल्ला घेऊन उपचार करणे फायदेशीर ठरेल.

### डॉक्टरांचा सल्ला कधी घ्यावा?

जर तुमच्या मुलांची उंची खूपच कमी असेल आणि त्याचा परिणाम मुलाच्या आत्मविश्वासावर होत असेल तर तुम्ही यासंदर्भात डॉक्टरांची मदत घेतली पाहिजे. डॉक्टर काही टेस्टच्या मदतीने तुम्हाला हे सांगू शकतात की उंची न वाढण्यामागचे नेमके कारण काय आहे. याशिवाय डॉक्टर कधी औषधे सुद्धा लिहून देऊ शकतात जी उंची वाढवण्यात मदत करतील. तर मंडळी आशा आहे या लेखातून उंची वाढवण्याबद्दलच्या अनेक प्रश्नांची उत्तरे तुम्हाला मिळत असतील. आवर्जून हा लेख शेअर करा आणि इतरांना सुद्धा माहिती द्या.

- मुलांची उंची वाढवण्याची पद्धत : आता आपण उंची वाढवण्याच्या काही सोप्या पद्धती जाणून घेऊया. मुलाच्या आहारामध्ये प्रोटीन, कार्बोहाइड्रेट, फॅट आणि व्हिटॅमिनची योग्य मात्रा ठेवा. त्यांना जंक फूडपासून दूर ठेवा आणि खाण्यामध्ये झिंकचा समावेश आवर्जून करा. सूर्य नमस्कार, चक्रासन आणि ताडासन यांच्या सहाय्याने सुद्धा उंची वाढवता येऊ शकते. स्विमिंग सुद्धा उंची वाढवण्यासाठी चांगला व्यायाम आहे. यामुळे सर्व शरीराचे स्नायू ॲक्टीव्ह होतात. निरोगी राहण्यासाठी रात्री चांगली झोप घेणे सुद्धा महत्त्वाचे आहे. जेव्हा मुलाचे शरीर निरोगी राहील तेव्हाच त्यांची उंची वाढण्यास मदत मिळेल. मुलांनी रात्री किमान ८ तास झोप घेणे महत्त्वाचे आहे. झोपेमधून एचजीएच नावाचे ग्रोथ हार्मोन रिलीज होते जे उंची वाढवण्यासाठी गरजेचे असते.
- तरुणवयात उंची वाढवणे : अनेकांना हा प्रश्न पडतो की मूल मोठे झाल्यावर किंवा वयात आल्यावर त्याची उंची वाढवता येऊ शकते का? तर त्याचे उत्तर आहे हो! ज्या मुलांची उंची कमी असते ते काही विशेष उपाय करून उंची वाढवण्यासाठी प्रयत्न करू शकतात. काही टिप्स जाणकारांकडून दिल्या जातात ज्या प्रभावीपणे उंची वाढवण्यात योगदान देऊ शकतात. पण जाणकार हे देखील सांगतात की या टिप्स प्रत्येक मुलावर त्यांच्या शारीरिक स्थितीनुसार परिणामकारक ठरतात. पण या उपायांमुळे कोणतेही साईड इफेक्ट्स होत नाहीत त्यामुळे प्रयत्न करायला हरकत नाही.

## मुलं सतत खोटं का बोलतात?

**मुलांना अनेक वाईट सवयी या लहानपणातच लागतात. कारण या वयात ते अजाण असतात आणि आपल्या सभोवतालच्या लोकांकडूनच अनेक गोष्टी शिकतात. म्हणजेच कुठेतरी घरातील आणि आसपासच्या व्यक्तीच त्यांना वाईट सवयी लावण्यास कारणीभूत असतात. अशीच एक सवय म्हणजे खोट बोलण्याची सवय होय. अनेक लहान मुलांना ही सवय नकळतपणे लागते. आई वडील सुद्धा मुल लहान आहे हळूहळू त्याला कळेल असं समजून दुर्लक्ष करतात. पण असं करणे हे अंगलट येऊ शकते हे पालकांना कळत नाही आणि त्याचा परिणाम असा होतो की मुल कधीच खोटं बोलणे सोडत नाही आणि हळूहळू बाहेरील जगात सुद्धा खोटेपणा करू लागतं. यासाठीच मुलाला वेळीच आवर घालणे आणि सांभाळणे महत्वाचे असते. तुमचीही मुलं खूप खोटं बोलत असतील आणि त्यावर काय उपाय करावा हे तुम्हाला कळत नसेल तर काळजी करू नका आज आम्ही तुम्हाला यावर जालीम उपाय सांगणार आहोत...**



### प्रामाणिकपणाचे मूल्य जपावे

ज्या कुटुंबात प्रामाणिकपणाचे संस्कार दिले जातात त्या घरातील मुलांना कधी खोटे बोलण्याची सवय लागत नाही. कारण त्यांच्या मनावर सतत सच्चेपणा आणि खरे बोलण्याचीच शिकवण दिली जाते. म्हणून आपल्या घरात नेहमीच खरेपणाचे संस्कार द्या. लहान मुलांना खरे बोलणे किती महत्त्वाचे आहे हे सतत सांगत राहा. कितीही कठीण प्रसंग असला तरी खरेच बोलावे हे त्यांच्या मनावर बिंबवा. खोटे बोलल्याने किती वाईट प्रसंग ओढवू शकतात आणि आपण किती मोठ्या संकटात फसू शकतो याबद्दल त्यांना सांगा.

### पालकांनी खरेपणा करावा

एका सर्वेक्षणात हे दिसून आले आहे की मुले ही आपल्या आई वडिलांकडूनच अनेक गोष्टी शिकतात. त्यामुळे पालकांनी स्वतः प्रथम खरेपणाचा अवलंब करावा. अनेकदा पालक नकळत मुलांच्या समोर खोटे बोलून जातात किंवा कधी कधी मुद्दाम त्यांना सुद्धा खोटे सांगतात. यामुळे मुलांच्या मनात खोटे बोलणे वाईट नसते असे वाटू शकते. याचा परिणाम म्हणजे मुले स्वतः देखील हळूहळू खोटे बोलण्यास सुरुवात करू शकतात. जर अशी परिस्थितीच येऊ द्यायची नसेल तर पालकांनी स्वतः खरेपणाने वागायला सुरुवात करायला हवे. तरच मुले देखील खरेपणाने वागतील.

- शिक्षा म्हणून काम करायला लावा : मूल खोटे बोलले म्हणून त्याला पालक सहसा ओरडतात, मारतात. पण असे करणे त्या मुलामध्ये अधिक राग निर्माण करणारे ठरू शकते. अशावेळी मुलांना मारणे आणि ओरडणे याशिवाय त्यांना अशी शिक्षा द्यावी जी त्यांच्या कायम लक्षात राहील. जसे की मुल जेव्हा खोटे बोलेल किंवा खोटे बोलताना पडकले जाईल तेव्हा त्याला घरातील काम करण्यास सांगावे आणि पुन्हा कधी तो खोटे बोलेल तेव्हा यापेक्षा मेहनतीचे काम दिले जाईल असे देखील दरडावे. लहानपणापासूनच मुलांशी असे वागलात तर नक्कीच त्यांची खोटे बोलण्याची सवय कमी होईल.
- स्तुती करा : लहान मुले अजाण असतात तशी संवेदनशील देखील असतात. खोटेपणा केला म्हणून जेव्हा तुम्ही मुलांना ओरडता तेव्हा साहजिकच त्या मुलाला दुःख होईल आणि रडू येईल. आपण पुन्हा असे करणार नाही अशी ते मूल गयावया देखील करेल. अशावेळी त्या मुलाला समजून घ्यावे आणि त्यांच्या वागणुकीत बदल दिसला तर त्याची स्तुती करावी. यामुळे साहजिकच त्याच्या मनातील पश्चातापाची भावना कमी होईल. त्यामुळे मुलांना ओरडण्यासोबतच वेळप्रसंगी त्याला जवळ घेऊन त्यांच्या खरेपणाबद्दल कौतुक सुद्धा करा.
- बोधकथा सांगा : आपल्या मराठी घरांमध्ये लहान मुलांना कथेच्या माध्यमातून चांगली मूल्ये शिकवण्याची संस्कृती आहे. ती संस्कृती तुम्ही देखील जपायला हवी. बोधकथांमधून लहान मुलांना चांगल्या गोष्टी शिकायला मिळतात. या कथा मुलांना लगेच कळतात देखील. टिव्हीवर सुद्धा कार्टूनच्या माध्यमातून चांगल्या गोष्टी मुलांना शिकवल्या जातात. मुलाला कथा ऐकायला आवडत नसेल तर तुम्ही त्याला असे कार्टून्स दाखवू शकता. एकंदरीत मुलाच्या कलाकलाने घेऊन तुम्ही त्याला खरेपणा आणि प्रामाणिकपणाचा धडा देऊ शकता.

## झपाझप वाढेल मुलांची उंची, खायला द्या हे पदार्थ

**मुलांच्या शारीरिक विकासात आहाराचा मोठा वाटा असतो. योग्य पोषणामुळे मुलांची उंची वाढू शकते आणि त्यांचा शारीरिक विकास सुधारतो. उंची वाढण्यासाठी काही विशिष्ट पोषक घटक अत्यंत महत्त्वाचे असतात, जसे की प्रथिने, कॅल्शियम, जीवनसत्त्वे आणि खनिजे. योग्य आहारामुळे मुलांची हाडे मजबूत होतात आणि उंची वाढण्यास मदत होते. मुलांची उंची वाढली नाही तर त्यांना चारचौघांत सतत मस्करीला सामोरं जावं लागतं. शिवाय एखाद्या ड्रिम जॉबमधील संधीही हुकू शकते. म्हणूनच चला, मुलांची उंची वाढवण्यासाठी कोणते अन्नपदार्थ उपयुक्त ठरतात याची माहिती घेऊया...**

- दूध आणि दुग्धजन्य पदार्थ : दूध कॅल्शियमचा उत्कृष्ट स्त्रोत आहे, जो हाडांच्या मजबुतीसाठी आवश्यक असतो. दुग्धजन्य पदार्थांमध्ये दही, पनीर आणि चीज यांचा समावेश होतो. यामध्ये व्हिटॅमिन डी आणि प्रथिनंही भरपूर प्रमाणात असतात, जे हाडे मजबूत करून उंची वाढण्यास मदत करतात.



- अंडी : अंड्यात प्रथिने, व्हिटॅमिन डी आणि बी २ यांचे प्रमाण जास्त असते. हे पोषक घटक हाडांच्या विकासासाठी आणि उंची वाढण्यासाठी अत्यंत महत्त्वाचे आहेत. नियमित अंड्याचे सेवन केल्यास मुलांच्या एकूण शारीरिक विकासाला चालना मिळते.
- संत्री आणि इतर फळे : संत्री, लिंबू यांसारख्या फळांमध्ये व्हिटॅमिन सी भरपूर असते, जे शरीराला कॅल्शियम शोषण्यास मदत करते. व्हिटॅमिन सीमुळे हाडांचे आरोग्य सुधारते आणि शरीराच्या रोगप्रतिकारक शक्तीला चालना मिळते, ज्याचा परिणाम मुलांच्या उंचीवर होतो.
- पालक आणि हिरव्या पालेभाज्या : पालक, मेथी, कोथिंबीर यांसारख्या पालेभाज्यांमध्ये कॅल्शियम, लोह आणि व्हिटॅमिन के असतात. हे घटक हाडांच्या मजबुतीसाठी आणि एकूण शारीरिक विकासासाठी उपयुक्त ठरतात. पालेभाज्यांचे नियमित सेवन उंची वाढीसाठी फायदेशीर ठरते.
- मांस आणि मासे : मासे, विशेषतः साल्मन आणि ट्यूना, ओमेगा-३ फॅटी ॲसिड्सने समृद्ध असतात, जे मेंदूच्या विकासासाठी आणि हाडांच्या आरोग्यासाठी उपयुक्त असतात. मांसामध्ये प्रथिनांचे प्रमाण जास्त असल्याने ते हाडे आणि स्नायूंच्या विकासासाठी मदत करते.
- सूर्यफुलाच्या बिया आणि सुकामेवा : बदाम, अक्रोड आणि काजू यांसारखे सुकामेवा आणि सूर्यफुलाच्या बियामध्ये प्रथिने, कॅल्शियम आणि खनिजे भरपूर असतात. हे घटक मुलांच्या हाडांच्या मजबुतीसाठी महत्त्वाचे आहेत आणि उंची वाढीसाठी उपयुक्त ठरतात. मुलांच्या उंचीच्या वाढीसाठी योग्य पोषण आवश्यक आहे. वर उल्लेख केलेले अन्नपदार्थ नियमित आहारात समाविष्ट केल्यास मुलांची उंची आणि एकूण शारीरिक विकास सुधारतो. पोषक आहारासोबत नियमित व्यायाम आणि पुरेशी झोप यावरही भर देणे गरजेचे आहे, ज्यामुळे मुलांची उंची नैसर्गिकरित्या वाढू शकते.

## डासांचा घरापासून दूर ठेवण्यासाठी ५ सोप्या टिप्स

**पावसाळ्यात डासांचा दहशत वाढते. खरंतर, हा ऋतू डासांच्या प्रजननासाठी असतो. या ऋतूमध्ये डास केवळ चावूनच त्रास देत नाहीत तर डेंग्यू, मलेरिया आणि चिकनगुनिया सारखे धोकादायक आजार देखील घेऊन येतात. अशा परिस्थितीत, त्यांच्यापासून स्वतःचे संरक्षण करणे खूप महत्वाचे आहे. आज आम्ही तुम्हाला अशा काही टिप्स (टिप्स टू कीप मॉस्किटोस अवे) सांगणार आहोत, ज्या घरातून डासांना दूर नेण्यासाठी खूप प्रभावी आहेत.**

- घरात पाणी साचू देऊ नका : डास साचलेल्या पाण्यात अंडी घालतात. सर्वप्रथम घराभोवती कुठेही पाणी साचू देऊ नका. घरातील भांडी, कूलर, बादल्या आणि टायर इत्यादींमध्ये पाणी साचू देऊ नका. जर पाणी भरले असेल तर ते नियमितपणे बदलत रहा किंवा झाकून ठेवा. छतावरील पाण्याची टाकी नेहमी बंद ठेवा. तसेच, गटारे आणि गटारे स्वच्छ ठेवा आणि त्यांना झाकून ठेवा, जेणेकरून पाणी वाहत राहील.
- मच्छरदाणी वापरा : रात्री झोपताना मच्छरदाणी वापरणे हा सर्वात प्रभावी मार्ग आहे. मच्छरदाणीला लहान छिद्रे असतात, ज्यामुळे गुदमरल्यासारखे होत नाही आणि डासांच्या चावण्यापासून देखील संरक्षण होते. याशिवाय, खिडक्या आणि दारांवर जाळी लावा. जेणेकरून वायुवीजन होईल आणि डास घरात येऊ नयेत. जर डासांची जाळी नसेल तर डास प्रतिबंधक क्रीम किंवा स्प्रे वापरा, विशेषतः जर तुम्ही घराबाहेर जात असाल तेव्हा.
- नैसर्गिक पद्धतींनी डासांना दूर करा : जर तुम्हाला डासांना दूर करण्यासाठी रासायनिक फवारण्या वापरायच्या नसतील, तर त्याऐवजी तुम्ही काही नैसर्गिक पद्धतींनी डासांना दूर करू शकता. एका भांड्यात पाण्यात कडुलिंबाचे तेल किंवा कापूर टाका आणि खोलीत ठेवा. डास त्याच्या सुगंधाने पळून जातात. लव्हेंडर आणि निलगिरीचे तेल शरीरावर लावा. त्यांच्या सुगंधामुळे डासांनाही दूर राहते. घराबाहेर तुळशीचे रोप लावल्यानेही डास दूर राहतात. याशिवाय, लसणाच्या वासापासूनही डास दूर राहतात. यासाठी, लसणाच्या काही पाकळ्या पाण्यात उकळा आणि स्प्रे बनवा आणि कोपऱ्यात फवारणी करा.
- घराची स्वच्छता आणि वायुवीजन राखा : डास अंधार आणि ओलसर ठिकाणी वाढतात. त्यांच्या राहण्यासाठी आणि प्रजननासाठी हे योग्य ठिकाण आहे. म्हणून, घर स्वच्छ ठेवा आणि कचराकुंडी झाकून ठेवा. तसेच, खोल्यांमध्ये ताजी हवा येऊ द्या आणि सकाळी सूर्यप्रकाश येण्यासाठी पडदे उघडा, जेणेकरून खोलीतील आर्द्रता कमी होईल. वापरानंतर बाथरूम आणि स्वयंपाकघर यासारख्या घरातील ओलसर जागा पूर्णपणे स्वच्छ आणि कोरड्या करा.
- डास प्रतिबंधक उपकरणाचा वापर : आजकाल, बाजारात डास प्रतिबंधक उपकरणे उपलब्ध आहेत, जसे की डास मारण्याचे रॅकेट, इलेक्ट्रिक डास प्रतिबंधक मशीन.

# आषाढी एकादशीच्या श्री विठ्ठल-रुक्मिणी महापूजेचे मुख्यमंत्री फडणवीसांना निमंत्रण

## मंदिर समितीच्या शिष्टमंडळाने घेतली सदिच्छा भेट

**मुंबई (प्रतिनिधी)** – श्री विठ्ठल-रुक्मिणीच्या आषाढी एकादशीच्या शासकीय महापूजेचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर समितीच्यावतीने निमंत्रण देण्यात आले.

यंदाच्या आषाढी एकादशी दिवशी रविवार, दि. ६ जुलै रोजी पहाटे २.२० वाजता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व मानाचे वारकरी यांच्या हस्ते सपत्नीक श्री विठ्ठल - रुक्मिणीमातेची शासकीय महापूजा करण्यात येईल. या महापूजेचे निमंत्रण देण्यासाठी मंदिर समितीचे सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज-औसेकर यांच्या शिष्टमंडळाने मुख्यमंत्री फडणवीस यांची वर्षा निवासस्थानी सदिच्छा भेट घेतली.

यावेळी मुख्यमंत्री फडणवीस यांचा मंदिर समितीच्या वतीने विणा, वारकरी पटका, श्रींची मूर्ती, उपरणे, चिपळ्या देऊन सन्मान करण्यात आला.

मंदिर समितीच्या सदस्या शकुंतला नडगिरे, संभाजी शिंदे, ह.भ.प. ज्ञानेश्वर देशमुख जळगावकर, अॅड. माधवी निगडे, अतुलशास्त्री भगरे गुरुजी, ह.भ.प. प्रकाश जवंजाळ, ह.भ.प. शिवाजीराव मोरे, कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यावेळी उपस्थित होते.

मंदिर समितीमार्फत आषाढी यात्रेच्या नियोजनाची तसेच श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर जतन व संवर्धन कामाची तसेच विठ्ठल



रुक्मिणी मातेचे जलद व सुलभ दर्शन होण्याच्या दृष्टीने राबवण्यात आलेल्या टोकन दर्शन प्रणालीची तसेच अन्य व्यवस्थेबाबत माहिती देण्यात आली.

# एक जुलैपासून अमरनाथ यात्रा मार्ग 'नो-फ्लाईंग झोन' घोषित

**श्रीनगर (प्रतिनिधी)** –अमरनाथ यात्रा येत्या ३ जुलैपासून सुरू होणार आहे. यात्रा आणि दहशतवादी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर कडक सुरक्षा व्यवस्था करण्यात येत आहे. जम्मू-काश्मीर सरकारने गृह मंत्रालयाच्या सल्ल्यानुसार यात्रेची सुरक्षा मजबूत करण्यासाठी पहलगाम आणि बालताल एक्सप्रेसवर हवाई निर्बंध लागू केले आहेत. यामुळे, संपूर्ण तीर्थयात्रा मार्ग आता 'नो फ्लाईंग झोन' म्हणून घोषित करण्यात आला आहे.

सरकारने सुरक्षेच्या कारणास्तव हा महत्वपूर्ण निर्णय घेतला आहे. केंद्रशासित प्रदेशाच्या गृह विभागाने पहलगाम आणि बालताल दोन्ही मार्गांसह अमरनाथ यात्रेचे सर्व मार्ग 'नो फ्लाईंग झोन' म्हणून घोषित केले आहेत. ही बंदी पहलगाम आणि बालताल दोन्ही मार्गांना व्यापणाऱ्या सर्व प्रकारच्या हवाई उपकरणांना लागू आहे. यामध्ये यूएव्ही, ड्रोन आणि फुगे असा सर्वांचा समावेश आहे. अमरनाथ यात्रा ३ जुलै ते ९ ऑगस्ट या कालावधीत होणार आहे. यात्रेत मोठ्या संख्येने भाविक सहभागी होतात आणि यात्रेला जातात. या काळात सुरक्षेत कोणतीही चूक होऊ नये यासाठी कडक व्यवस्था केली जात आहे. सुरक्षेच्या दृष्टीने हे मोठे पाऊल उचलण्यात आले आहे. हे सुरक्षा निर्देश एक जुलै ते १० ऑगस्ट या कालावधीत लागू असतील. तथापि, वैद्यकीय आणीबाणी, आपत्ती व्यवस्थापन किंवा सुरक्षा दलांनी राबवलेल्या देखरेखीच्या कारवाया अशा काही प्रकरणांमध्ये हा निर्णय लागू होणार नाही, असेही स्पष्ट करण्यात आले आहे. अशा अपवादांसाठी तपशीलवार मानक कार्यपद्धती (एसओपी) नंतर जारी केल्या जातील. अधिकाऱ्यांनी आश्वासन दिले आहे की, यात्रा शांततेत पार पाडण्यासाठी सर्व सुरक्षा उपाययोजना केल्या जात आहेत.

---

## टी.सी.हरवली

माझी सोनटक्के नागेश प्रभाकर या नावाची १० वी प्रवेशास पात्र अशी टी.सी. नांदेड ते वानेगाव रेल्वे प्रवासात हरवली आहे. कोणास सापडल्यास खालील नंबरवर संपर्क करावे. **–संपर्क पत्ता– सोनटक्के नागेश प्रभाकर मो.८९९९६८९९०९, ८३८०८६३०२१**

## टी.सी.हरवली

माझी लक्ष्मण संभाजी रासे या नावाची १० नापासची टी.सी. पुर्णा ते नांदेड बस प्रवासात हरवली आहे. कोणास सापडल्यास खालील नंबरवर संपर्क करावे.

**–संपर्क पत्ता– लक्ष्मण संभाजी रासे मो.९०९६८०२२१०**

## टी.सी.हरवली

माझी अनिता दशरथ छप्पेकर रा. बिलोली ता. बिलोली जि. नांदेड या नावाची छच् पास ची टी. सी. बिलोली ते नांदेड बस प्रवासात हरवली असून कुणाला सापडल्यास खालील क्रमांकावर संपर्क साधावा.

**–संपर्क पत्ता– अनिता दशरथ छप्पेकर रा.बिलोली ता.बिलोली जि. नांदेड मो.७५८८६४३४२८**

## नगरपरिषद बिलोली कार्यालय जिल्हा नांदेड
## निविदा सुचना जा.क्र.बीनप/२०२५/२२८
## दिनांक १७/६/२०२५

मुख्याधिकारी नगरपरिषद बिलोली जिल्हा नांदेड यांच्याकडील नगरपरिषदेच्या खंडातुन शहरात विविध ठिकाणी विद्युत विभागातील दुरुस्थती विषयक कामे व इतर अनुषंगिक साहित्य पुरवठा करणे तसेच शहरातील स्ट्रिट लाईट दुरूस्ती व नविन एलईडी लाईट बसविणे व बसविण्यासाठी प्रतिपोल वर माणसाची मजूरी, नविन केबल खरेदी करणे, नविन पोल बसविणे तसेच कार्यालयातील टयुब बदलणे, पंखे बदलणे व अन्य काही दुरूस्थी विषयक कामासाठी माणूस प्रति दिवस मजुरीने तसेच विद्यूत विषयक दुरूस्थी कामे करण्यासाठी वार्षिक निविदा ऑफलाईनरित्या द्विनोंद लिफाफा पद्धतीने मागविण्यात येत आहे.सदरील कामाची निविदा प्रपत्र रक्कम रूपये ५०० अधिक जीएसटी १८ टक्के आहे. सदर कामाची अटी व शर्तीसह सविस्तर सुचना नगरपरिषद बिलोली कार्यालयात दिनांक १८/६/२०२५ रोजी ११.०० वाजेपासून ते दिनांक २६/६/२०२५ सायंकाळी १६.०० वाजेपर्यंत पाहता येतील व भरणा करता येतील

**मुख्याधिकारी नगरपरिषद बिलोली**

## Change In Name

My old Name is SANDIP DAMODHARRAO MUTTEPAWAR which now I am Changing as New Name SANDEEP DAMODHAR MUTTEPAWAR Hence forth My All Correspondence will be done as per my new name. Please consider the same, SIGN BY-SANDEEP MUTTEPAWAR RADHA DAMODAR HIGHTS N.58 ASHOK NAGAR NANDED 431605 MO.9225753500

## Change In Name

My old Name is HAZRA BEGUM Which now I am Changing as New Name HAZRA WASEEM SAYYAD Hence forth My All Correspondence will be done as per my new name. I.E. HAZRA WASEEM SAYYAD Please consider the same, Address- Madina Nagar, Mudkhed Dist Nanded Mob.No. 7416789590

---

**महाराष्ट्र शासन**
**कार्यकारी अभियंता**
**सार्वजनिक बांधकाम विभाग,देगलुर**
**ई -निवीदा सुचना क्रमांक 04 सन 2025-2026**

कार्यकारी अभियंता,सार्वजनिक बांधकाम विभाग,देगलुर जिल्हा नांदेड (दुरध्वनी क्रमांक 02463-255111) हे महाराष्ट्र शासनकडील योग्य त्या प्रवर्गतील नोंदणीकृत कंत्राटदाराकडुन नांदेड जिल्ह्यातील एकुण ( 10 ) कामांकरीता ब-1 नमुन्यातील ई -निवीदा (ऑनलाईन )प्रणालीव्दारे मागाविण्यात येत आहे.

या निवीदे अंतर्गतची संपुर्ण माहिती खालील संकेस्थळावर उपलब्ध आहे.

टीप-1) निवीदा कागदपत्राचा तपशील महाराष्ट्र शासनच्या ई -टेंडरिंग संकेतस्थळ https://mahatenders.gov.in/nicgep/app आणि www.mahapwd.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे.

2) सदर निवीदा सुचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईटवर कळविण्यात येईल.

3) निवीदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता,सार्वजनिक बांधकाम विभाग,देगलुर यांनी राखुन ठेवला आहे.

कार्यकारी अभियंता
सार्वजनिक बांधकाम विभाग,देगलुर
जि.नांदेड

## टी.सी.हरवली

माझी सुविधा देविदास चव्हाण या नावाची १२ पासची टी.सी. व मार्कमेमो व सनद व इतर कागदपत्र मुखेड ते नांदेड बस प्रवासात हरवली आहे. कोणास सापडल्यास खालील नंबरवर संपर्क करावे.

**–संपर्क पत्ता– देविदास गोविंद चव्हाण रा.चव्हाणवाडी बाऱ्हाळी ता.मुखेड जि.नांदेड मो.९९७५०३४६७१**

## कुत्रीचे पिल्ले विकणे आहे

डॉबर मॅन, जर्मन शेफर्ड, ग्रेडन, लेबरा डॉग, पामोलियन इत्यादी १२० प्रकारच्या जातीची कुत्रीचे पिल्ले मिळतील.



संपर्क गोपालअण्णा
डॉग डिलर
मोबाईल नंबर
९८५०६८८५२८

---

जा.क्र./१८७९/२००५ सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय नांदेड विभाग, नांदेड जिजामाता धर्मशाळा पब्लिक ट्रस्ट, नांदेड गवळीपुरा, पेट्रोलपंपाच्या बाजूला, रेल्वे स्टेशन समोर, नांदेड. ता. जि. नांदेड-४३१६०१ दिनांक : ११/ ०६ /२०२५

## जाहिर नोटीस

मा. श्रीमती हि. का. शेळके, धर्मादाय सह आयुक्त, नांदेड विभाग, नांदेड. यांचे न्यायालयात (महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम-१९५० चे कलम ३६ (१) (अ) अन्वये) महात्मा फुले शिक्षण प्रसारक मंडळ, नांदेड ता. जि. नांदेड. नों.क्र. एफ- ४७ (नांदेड)

**या न्यासाची स्थावर मिळकत विकासकामाच्या करारावर वर देणे करीता अर्ज क्र. २०/२०२४ कलम ३६ (१) (अ) प्रकरणाबाबत**

सर्व जनतेस कळविण्यात येते की, महात्मा फुले शिक्षण प्रसारक मंडळ, नांदेड ता. जि. नांदेड. नों.क्र. एफ- ४७ (नांदेड) या न्यासाच्या मालमत्तेची सर्व्हे नं. ७२ मधील लेबर कॉलनी येथील सदनिका अंदाजे ३३ ते ४० (रूंदी ४३.५ फुट पुर्व ते पश्चिम आणि लांबी ८० फुट दक्षिण ते उत्तर) जिचे एकुण क्षेत्रफळ ३४८० चौ. फुट जसेकी ३२३.४२ चौ. मिटर नांदेड ता. जि. नांदेड येथील . सदरील न्यासाचे डेव्हल्पमेन्ट अग्रीमेन्ट करावयाचे ठरविले आहे. त्याबाबत बाबात परवानगी देण्यासाठी अर्ज दाखल केलेला असुन जिची चतु:सिमा पुढील प्रमाणे आहे.

१. पुर्वेस : ३० फुट रोड २. पश्चिमेस : मोकळी जागा माडा() ३.दक्षिणेस : ३० फुट रोड ४. उत्तरेस : ३० फुट रोड

सदरील प्रस्ताव हा मा. धर्मादय सह आयुक्त, नांदेड विभाग, नांदेड यांच्या कार्यालयात दाखल करण्यात आलेला असुन यात दि १९.०५.२०२५ रोजी झालेल्या मा. धर्मादाय सह आयुक्त, नांदेड विभाग, नांदेड यांचे आदेशान्वये प्रस्तावास कोणासही आक्षेप असल्यास संबंधित कागदपत्रासह लेखी स्वरूपात दि. १५.०७.२०२५ पुर्वी नांदेड कार्यालयात सादर करावा. आज दि. ११.०६.२०२५ रोजी माझे सहीनिशी व मा. धर्मादाय सह आयुक्त, नांदेड विभाग, नांदेड यांच्या शिक्क्यानिशी सदरची जाहीर प्रगटन देण्यात येत आहे.

**आदेशावरून.**

**(एस.बी.राष्टकुट)** **(श्रीमती पी.जे.राय)**
**रिरस्तेदार**

**अधिक्षक**
**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय नांदेड विभाग, नांदेड**

---

## प्रवेश देणे चालू आहे.

**श्री संत बाळगिर महाराज शिक्षण संस्था कापसी गुंफा ता.लोहा जि.नांदेड द्वारा संचलित**
**श्री संत बाळगिर महाराज विद्यार्थी वसतिगृह कापसी गुंफा ता.लोहा जि.नांदेड**

सदरील शासनामान्य अनुदानित मागासवर्गीय विद्यार्थी वसतिगृहात शैक्षणिक वर्षे २०२५-२६ या वर्षासाठी इयत्ता ५ ते १० वी मध्ये शिकत असलेल्या व स्थानिक विद्यालयात प्रवेश घेणाऱ्या गरजू व होतकरू विद्यार्थ्यांना खालील प्रमाणे जातीनिहाय टक्केवारीनुसार प्रवेश देणे चालू आहे

| अ.क्र. | जातीचा प्रवर्ग | टक्केवारी |
|---|---|---|
| १ | अनुसुचीत जाती (एस.सी) | ६७ टक्के |
| २ | अनुसुचीत जमाती (एस.टी) | १४ टक्के |
| ३ | वि.जा./भ.ज./व्ही.जे./एन.टी | १७ टक्के |
| ४ | विशेष मागासप्रवर्ग | २ टक्के |
| | एकूण | १०० टक्के |
| ५ | इतर मागासवर्ग ओबीस | १५ टक्के |
| ६ | बिगर मागासवर्ग ओपन | ५ टक्के |

**वैशिष्टये:१.**भव्य व सुसज्ज इमारत, २.विनामुल्य भोजन व राहण्याची व्यवस्था ३.पिण्याची शुद्ध पाण्याची सोय ४.विद्यार्थ्यांच्या अभ्यासाकडे वैयक्तीक लक्ष ४.वसतिगृहात ग्रंथालय ५. वाचनालयाची सोय व शिक्षणाची सोय एकूण मान्य संख्यच्या २० टक्के जातीच्या इतर मागास प्रवर्ग ओबीसी १५ टक्के व बिगर मागासवर्ग ओपन ५ टक्के विद्यार्थ्यांस प्रवेश दिला जाईल.अनुशेषाप्रमाणे विद्यार्थी नाही मिळाल्यास इतरांचा विचार केला जाईल.

**अध्यक्ष** **अधिक्षक**
**श्री संत बाळगिर महाराज विद्यार्थी वसतिगृह कापसी गुंफा ता.लोहा जि.नांदेड मो.९८२३१०११६२,**

---

**फुले समाजसुधारक समितीद्वारा संचलित**
**दलितवर्ग संघ विद्यार्थी वसतिगृह मुखेड ता.मुखेड जि.नांदेड**
**शाहीर अण्णाभाऊ साठे विद्यालय मुखेड**
UDISE NO-27160611318

## प्रवेश देणे चालू आहे.

सन २०२५-२०२६ शैक्षणिक वर्षात इयत्ता ५ वी ते १० वी वर्गात शिकत असलेल्या विद्यार्थ्यांना वसतिगृहात जातीनिहाय टक्केवारीनुसार प्रवेश देणे चालू आहे.

| अ.क्र. | जातीचा प्रवर्ग | टक्केवारी | विद्यार्थी संख्या |
|---|---|---|---|
| १ | अनुसुचीत जाती (एस.सी) | ६७ टक्के | १४३ |
| २ | अनुसुचीत जमाती (एस.टी) | १० टक्के | २० |
| ३ | वि.जा./भ.ज./व्ही.जे./ एन.टी | १८ टक्के | ३७ |
| ४ | विशेष मागासप्रवर्ग एसबीसी | २ टक्के | ४ |
| ५ | इतर मागासवर्गीय ओबीसी | १५ टक्के | ३१ |
| ६ | खुला प्रवर्ग ओपन | ५ टक्के | १० |
| | एकूण | - | २४५ |

**वैशिष्टये:-१.**मोफ त प्रवेश,सकाळी नाश्ताची सोय,सुसज्ज इमारत,मोफ त निवास व भोजनाची सोय,शिक्षकांकडून शैक्षणिक मार्गदर्शन,गादी अंथरून पांघरून,ताट,वाटी, ग्लास पेटी व गणवेशाची मोफ त सोय,जनरेटची सोय,फिल्टर पाणी व स्विमिंग पुलाची सोय

**मुख्याध्यापक** — बी.जी.वडले, शाहीर अण्णाभाऊ साठे माध्यमिक व उच्च मा. विद्यालय मुखेड ७०२८९००९१६,९४२३४४०३९३ ९६६५१२२९१६

**अधिक्षक** — दलितवर्ग संघ विद्यार्थी वसतिगृह मुखेड मो.९९२३६८९९०६ ९७६४०६७२७३, ९८९०८३६४२३ ८१२५८८७५७२

**अध्यक्ष** — मा.अविनाश घाटे फुले समाज सुधारक समिती नांदेड मो.९१३०८७०००७

---

## Change In Name

My old Name is MUSTAFAIZ AHMED which now I am Changing as New Name SHAIKH MUSTAFAIZ AHMED Hence forth My All Correspondence will be done as per my new name. Please consider the same, SIGN BY-SHAIKH MUSTAFAIZ AHMED

ADD-SHAIKH ALTAF AHEMD1-19-587 BABA NAGAR NEAR GANPATI MANDIR NANDED

## Change In Name

My old Name is OMPRAKASH which now I am Changing as New Name OMPRAKASH KANEYHAL SHARMA Hence forth My All Correspondence will be done as per my new name. Please consider the same, SIGN BY-OMPRAKASH KANEYHAL SHARMA

ADD-MU.POSTMANWATHTQ.MANWATH SABHAGRAHA JAVAL MANWATH KOLHA PARBHANI 431505 MO.9422638791

## Change In Name

My old Name is REETA which now I am Changing as New Name REETA INDERCHAND DAYAMA Hence forth My All Correspondence will be done as per my new name. Please consider the same,

SIGN BY-REETA INDERCHAND DAYAMA

ADD-10-2-665/2 TULSI SADAN OLD KAUTHA NANDED 431603 MO.9422155280

---

**शासन मान्य**

## प्रवेश देणे चालू आहे.

**डॉ.आंबेडकर विद्यार्थी वस्तीगृह डोंगरगाव ता.लोहा जि.नांदेड**

या शासना मान्य वसतीगृहात सन २०२५-२०२६ शैक्षणिक वर्षासाठी प्रवेश घेणाऱ्या इयत्ता ५ वी ते १० वी वर्गात शिकत असलेल्या गरजू विद्यार्थ्यांना प्रवेश देणे चालू आहे.एकूण ४४ विद्यार्थ्यांना मोफत प्रवेश देणे चालू आहे. सुसज्ज इमारत, राहण्याची, सकाळच्या नाशत्याची जेवणाची अतिशय उत्तम सोय आहे.तसेच अंथरूण, पांघरूण व प्लेट व पेट्यांची, लाईट व पाण्याची अतिशय उत्तम सोय आहे.

| अ.क्र. | जातीचा प्रवर्ग | टक्केवारी |
|---|---|---|
| १ | अनुसुचीत जाती (एस.सी) | ६७ टक्के |
| २ | अनुसुचीत जमाती (एस.टी) | १४ टक्के |
| ३ | वि.जा./भ.ज./व्ही.जे./एन.टी | १७ टक्के |
| ४ | विशेष मागासप्रवर्ग एस.बी.सी | २ टक्के |
| | एकूण | १०० टक्के |
| ५ | इतर मागासवर्ग | १५ टक्के |
| ६ | खुला प्रवर्ग | ५ टक्के |

**नोट :वरील टक्केवारीनुसार विद्यार्थी न आल्यास उपलब्ध जातीमधील विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात येईल.**

**संचालक**
**डॉ.बाबासाहेब विद्यार्थी वसतीगृह डोंगरगाव ता.लोहा जि.नांदेड**

---

**डॉ.बाबासाहेब आंबेडकर मुलांचे वसतिगृह कंधार जि.नांदेड**

## प्रवेश देणे चालू आहे.

सन २०२५-२०२६ शैक्षणिक वर्षासाठी प्रवेश घेणाऱ्या इयत्ता ५ वी ते १० वी वर्गात शिकत असलेल्या गरजू विद्यार्थ्यांना प्रवेश देणे चालू आहे. वरील वसतीगृहात मोफत प्रवेश, सुसज्ज इमारत, राहण्याची, सकाळच्या नाशत्याची जेवणाची अतिशय उत्तम सोय आहे.तसेच अंथरूण, पांघरूण व प्लेट व पेट्यांची अतिशय उत्तम सोय आहे.

| अ.क्र. | जातीचा प्रवर्ग | टक्केवारी |
|---|---|---|
| १ | अनुसुचीत जाती (एस.सी) | ६७ टक्के |
| २ | अनुसुचीत जमाती (एस.टी) | १४ टक्के |
| ३ | वि.जा./भ.ज./व्ही.जे./एन.टी | १७ टक्के |
| ४ | विशेष मागासप्रवर्ग एस.बी.सी | २ टक्के |
| ५ | इतर मागासवर्गीय ओबीसी | १५ टक्के |
| ६ | ओपन खुला | ५ टक्के |

**नोट :** दिनांक १५ जून २०२४ पासून प्रवेश देणे चालू आहे. प्रवेश घेण्याची अंतिम तारीख ३० जून २०२४ पर्यंत राहील.आरक्षण प्रमाणे विद्यार्थी न मिळाल्यास इतर जातीच्या विद्यार्थ्यांस प्रवेश देण्यात येईल.याची नोंद घ्यावी

**अध्यक्ष/अधिक्षक**
**डॉ.बाबासाहेब आंबेडकर मुलांचे वसतिगृह कंधार ता.कंधार जि.नांदेड**

---

प्रवेश देणे चालू आहे सरकार मान्य २०२५-२६
सेवादास शिक्षण प्रसारक मंडळ संचलित
**संत गाडगेबाबा विद्यार्थी वसतीगृह लोहा व श्री नाईक विद्यार्थी वसतीगृह लोहा**

या दोन वसतीगृहात सन २०२५-२६ साठी स्थानिक विद्यालयात प्रवेश घेणाऱ्या इयत्ता ५ वी ते १० वी वर्गात शिकत असलेल्या गरजू विद्यार्थ्यांना मोफत प्रवेश देणे चालू आहे.तरी खालील प्रमाणे जातीनिहाय टक्केवारीनुसर प्रवेश देण्यात येईल

| अ.क्र. | जातीचा प्रवर्ग | टक्केवारी |
|---|---|---|
| १ | अनुसुचीत जाती (एस.सी) | ६७ टक्के |
| २ | अनुसुचीत जमाती (एस.टी) | १४ टक्के |
| ३ | वि.जा./भ.ज./व्ही.जे./एन.टी | १७ टक्के |
| ४ | विशेष मागासप्रवर्ग एस.बी.सी | २ टक्के |
| | एकूण | १०० टक्के |
| ५ | इतर मागासवर्गीय ओबीसी | १५ टक्के |
| ६ | ओपन खुला | ५ टक्के |

**नोट :** मोफत प्रवेश, सुसज्ज इमारत,मोफत निवास व भोजनाची सोय, पेट्याची सोय, अंथरूण पांघरूणाची सोय, सिसिटीव्ही कॅमेऱ्याच्या नजरेत

**अधिक्षक मो.९८९००३७९६२, ९८९००२८७७३** **अध्यक्ष**
**संत गाडगेबाबा विद्यार्थी वसतीगृह लोहा व श्री नाईक विद्यार्थी वसतीगृह लोहा**

---

## जाहीर प्रगटन

माझे पक्षकारांनी दिलेल्या माहिती व अधिकारावरून हे जाहीर प्रगटन प्रसिद्धीस देत आहे

हे की, माझ्या पक्षकारांनी श्री बालाजी हरीभाऊ गोरे रा.जुना कौठा नांदेड यांच्या मालकी व ताब्यातील मौजे चोरंबा (नां) ता.अर्धापुर जि.नांदेड येथील शेत गट क्र. ११७/४ एकूण क्षेत्र.०४ हेक्टर ५७ आर पैकी त्यांच्या मालकी व ताब्यातील ०० हेक्टर ७५ आर जमिन ज्याची चुर्तसिमा खालील प्रमाणे

पुर्वेस- दोन्ही गटाचा अंतर्गत रस्ता, पश्चिमेस - सुभाष लंगडे यांची जमिन, दक्षिणेस- विलास बाचेवार यांची जमिन, उत्तरेस-

फुलारी यांची जमिन

ती संपुर्ण जमिन माझ्या पक्षकारांनी कायमचे खरेदी करण्याचा लेखी करार केला असून करारावर इसारा रक्कम सुद्धा दिली आहे. व उर्वरीत रक्कम देवून सदर शेताचे नोंदणीकृत खरेदीखत करण्याचे ठरले आहे.

तरी सर्व जनतेस व संबंधीतास या जाहीर प्रगटनाद्वारे सुचित करण्यात येते की, सदरील शेती बाबत कोणाचा काही हक्क संबंध असतील किंवा सदरील शेत जमिनी बाबत यापुर्वी इतर कोणाचे व्यवहार झाले असत्यास किंवा सदरील शेत जमिनीवर शासकीय, निमशासकी, किंवा खाजगी कर्ज असेल तर संबंधीतांनी प्रस्तुत जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्या तारखेपासून ७ दिवसाच्या आत आपला लेखी आक्षेप अथवा उजर संबंधीत कागदपत्रासह खालील पत्यावर नोंदवावा. मुदतीत कोणाचा काही आक्षेप न असल्यास माझे पक्षकार कायदेशीर रित्या सदरील व्यवहार पुर्ण करतील व मुदतीनंतर आलेला आक्षेप किंवा उजर माझे पक्षकारावर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

करीता हे जाहीर प्रगटन

**अॅड.गजानन बी.पत्रे**
**अर्धापुर मो.९४२१८३८१३८**

स्थलांतर
सिटी मॅक्स डिजिटल कलर
मो.7058766021,9422185282
गड्डम मार्केट,पहिला मजला,
शिवाजी नगर,नांदेड

गोदातीर समाचार

पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस
हर्बल ट्रिटमेंट
१६ वर्षापासून नांदेडकरांच्या सेवेत...

किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकूण, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.
पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड
मो. 9284804221, 9637704308



# नांदेड परिक्षेत्रात हातभट्टी निर्मूलनासाठी 'मासरेड'





**नांदेड (प्रतिनिधी)–** नांदेड परिक्षेत्राचे पोलीस उप महानिरीक्षक शहाजी उमाप यांच्या मार्गदर्शनाखाली नांदेड परिक्षेत्रात अवैध हातभट्टीची दारू व रसायनाचा नाश, त्याचप्रमाणे अवैध दारूची वाहतूक व विक्री व्यवसायांचे समूळ उच्चाटन करण्यासाठी दि.१४ जून रोजी नांदेड परिक्षेत्रातील चारही जिल्ह्यांत एकाच वेळी मासरेड करण्यात आला. या कारवाईत परिक्षेत्रातील (१३६) अधिकारी व (४८७) अंमलदार सहभागी झाले होते. चारही जिल्हयांनी केलेल्या मासरेड दरम्यान एकुण १३२ केसेस करण्यात आल्या. तसेच ७ लाख २४ हजार ९९५ रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. यात नांदेड जिल्हयातील रामतिर्थ, धर्माबाद, बिलोली, भोकर व कुंडलवाडी पोलीस ठाण्यांच्या हद्दीत पकडलेल्या सिंधीचा समावेश आहे.

नांदेड जिल्ह्यात ६१ गुन्हे दाखल करून ६१ आरोपीवर कारवाई करण्यात आली. यात हातभटटी दारु ७२७ लिटर, दारुचे रसायन ३२५० लिटर, देशी दारु ६२२ बॉटल, विदेशी दारु १४ बॉटल, सिंधी १३९५ लिटर असा ३ लाख ३६ हजार ८८० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या कारवाईत ४८ अधिकारी व १३२ अंमलदारांनी सहभाग घेतला.

परभणी जिल्ह्यात २२ गुन्हे दाखल करून २२ आरोपी गजाआड करण्यात आले. यात हातभटटी दारु २० लिटर, दारुचे रसायन १०० लिटर, देशी दारु ४८७ बॉटल असा ५८ हजार ५८० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. ११२ अंमलदार व ४० अधिकयांनी सहभाग घेतला.

हिंगोली जिल्ह्यात १७ गुन्हे दाखल करून १७ आरोपींना ताब्यात घेण्यात आले. हातभटटी दारु १९ लिटर असा ८५ हजार ४५० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या कारवाईत २० अधिकारी व १२०, अंमलदारांनी सहभाग घेतला.

लातूर जिल्ह्यातील कारवाईत ४१ गुन्हे नोंद केले. तर ४३ आरोपींवर कारवाई करण्यात आली. यात हातभटटी दारु ३१७ लिटर, दारुचे रसायन २८३५ लिटर, देशी दारु ४८२ बॉटल असा २ लाख ४४ हजार ०८५ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या कारवाईत १२३ अंमलदार व २८ अधिकाऱ्यांनी सहभाग घेतला.

सदर कारवाईत नांदेडचे पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, परभणीचे पोलीस अधीक्षक रवींद्रसिंह परदेशी, हिंगोलीचे पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे व लातूरचे पोलीस अधीक्षक सोमय मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली, संबंधित जिल्ह्यातील अपर पोलीस अधीक्षक, सर्व पोलीस उप अधीक्षक, संबंधित पोलीस ठाण्यांचे पोलीस निरीक्षक/सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक, पोलीस उपनिरीक्षक, अंमलदार यांच्यासह स्थानिक गुन्हे शाखेचे अधिकारी व अंमलदार यांचा समावेश होता.

आपल्या भागातील अवैध व्यवसायांची माहिती, नागरिकांनी नजीकच्या पोलीस ठाण्यास अथवा पोलीस उप महानिरीक्षक कार्यालयाच्या nandedrange.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर कळवून अशा अवैध व्यवसायांचा बिमोड करण्यासाठी आपला हातभार लावावा, असे आवाहन नांदेड परिक्षेत्राचे पोलीस उप महानिरीक्षक शहाजी उमाप यांनी केले आहे.

# अर्धापूर नगरपंचायत मुख्याधिकारी जगदीश दळवी यांनी पदभार स्विकारला



**अर्धापूर (प्रतिनिधी)–** नगर पंचायतीचे मुख्याधिकारी म्हणून जगदीश दळवी हे रूजू झाले आहेत. रूजू होताच नगरपंचायतीचे पदाधिकारी व कर्मचाऱ्यांनी स्वागत केले आहे.

नगर पंचायतीच्या कार्यकाळ पूर्ण करून मुख्याधिकारी शैलेश फडसे यांची बदली झाली आहे. त्यांच्या जागेवर नगरपंचायतीचे मुख्याधिकारी म्हणून जगदीश दळवी यांनी पदभार स्वीकारला आहे. मुख्याधिकारी जगदीश दळवी हे अत्यंत शिस्तीचे अधिकारी म्हणून परिचीत आहेत. मुख्याधिकारी जगदीश दळवी यांच्या सत्कार नगराध्यक्ष प्रतिनिधी प्रविण देशमुख, उपनगराध्यक्ष मुक्तेदरखान पठाण माजी नगराध्यक्ष छत्रपती कानोडे, गटनेते बाबुराव लंगडे, नगरसेवक सोनाजी सरोदे, डॉ. नगसेवक प्रतिनिधी डॉ. विशाल लंगडे, सरचिटणीस प्रल्हादराव माटे, मुस्वीर खतीब, नामदेव सरोदे, व्यंकटी राऊत, सलीम कुरेशी, नगरसेवक गाजी काजी, मिर्झा शहबाज बेग, अझर काजी यांच्यासह अनेकांनी सत्कार करून शुभेच्छा दिल्या. यावेळी नगरपंचायतीचे अधिकारी व कर्मचारी व पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.




**नांदेड :** राष्ट्रमाता माँसाहेब जिजाऊ स्मृतीदिनानिमित्त हनुमानगड जानकीनगर येथील राजमाता जिजाऊ सृष्टी उद्यानात राष्ट्रमाता माँसाहेब जिजाऊ यांच्या पुतळ्याला आमदार आनंदराव बोंढारकर यांनी अभिवादन केले. यावेळी विठ्ठल पावडे, संकेत पाटील, उमेश पवळे, प्रशांत तिडके, सुनील कदम, दर्शनसिंघ सिद्धू, दशरथ कपाटे, गजानन मुधोळ आदी दिसत आहेत. (छाया : करणसिंह बैस)

# गुरुकुल पब्लिक स्कूल बंद, निवासी वसतिगृह योजनाही ठप्प; १५० विद्यार्थी शिक्षणापासून वंचित

**नांदेड (प्रतिनिधी)–** नांदेडमधील गुरुकुल पब्लिक स्कूल ही शाळा अनपेक्षितपणे बंद करण्यात आली आहे. त्यामुळे या शाळेला संलग्न असलेली 'राजे यशवंतराव होळकर निवासी वसतिगृह योजना' देखील ठप्प झाली आहे. या निर्णयाचा थेट परिणाम सुमारे १५० विद्यार्थ्यांवर झाला असून ते शिक्षणापासून वंचित झाले आहेत. यामुळे विद्यार्थ्यांच्या भविष्यावर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.




या घटनेविरोधात मागील दोन दिवसांपासून विद्यार्थ्यांसह पालक सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण कार्यालयाच्या समोर उपोषण करत आहेत. शाळा व वसतिगृह पुन्हा सुरू करावेत आणि विद्यार्थ्यांचे शिक्षण पुन्हा मार्गी लावावे, अशी मागणी करण्यात आली आहे.

गुरुकुल पब्लिक स्कूल मध्ये ग्रामीण आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल विद्यार्थ्यांसाठी शासनाच्या योजनेअंतर्गत एक महत्त्वाची शैक्षणिक सुविधा होती. विद्यार्थ्यांना येथे निवासासह शिक्षणाची संपूर्ण सोय करण्यात आली होती. मात्र, शाळा बंद झाल्यामुळे वसतिगृहातील मूलभूत सेवा देखील बंद करण्यात आल्याने विद्यार्थ्यांना शिक्षण थांबवावे लागत आहे.

यासंदर्भात ओबीसी बहुजन पार्टीचे जिल्हाध्यक्ष महेंद्र देमगुंडे, प्रदीप सरोदे, बालाजी गडदे, कुबीरराव भुतनर, बळवंत मस्के, विठ्ठल हाके, अशोक लाकडे, मारोती डोके, मारोती चितंले, अश्विन नाईक आदींनी शासनाला तातडीने कारवाई करण्याची मागणी केली आहे.

त्यांनी दिलेल्या इशाऱ्यानुसार, शासनाने पर्यायी शिक्षण व्यवस्था व नवीन वसतिगृह सुविधा लवकरात लवकर उपलब्ध करून द्याव्यात आणि संबंधित शाळा व्यवस्थापनावर तातडीने कार्यवाही करावी, अन्यथा हा आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशारा दिला आहे.

## राजाबाई जाधव यांचे निधन

**बारूळ (प्रतिनिधी)–** येथील ज्येष्ठ महिला राजाबाई शेषराव जाधव (९५) यांचे सोमवारी (दि.१६) नांदेड येथे वृद्धापकाळाने निधन झाले.



त्यांच्यावर बारूळ येथे १७ रोजी अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात तीन मुले, एक मुलगी, सुना, नातू, पणतू असा परिवार आहे. गव्हर्नमेंट मेडिकल कॉलेज अंबेजोगाईचे सेवानिवृत्त प्रशासकीय अधिकारी सुधाकर पाटील जाधव यांच्या त्या मातोश्री होत.

# पत्रकार मधुकर भावे यांचे रविवारी शहरात व्याख्यान

**नांदेड (प्रतिनिधी)–** स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाने गतवर्षी ज्यांचे व्याख्यान अचानक रद्द केले, ते ज्येष्ठ संपादक आणि वक्ते मधुकर भावे यांचे व्याख्यान अभंग पुस्तकालयाच्या पुढाकारातून आणि एमजीएम शिक्षण संस्थेच्या सहयोगातून येत्या रविवारी (दि.२२) होणार आहे.



जिल्हाधिकारी कार्यालय परिसरातील नियोजन भवनाच्या सभागृहात सायंकाळी ६ वाजता होणाऱ्या या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान माजी शिक्षणमंत्री व एमजीएमचे अध्यक्ष कमलकिशोर कदम भूषविणार असून प्रमुख पाहुणे म्हणून खासदार प्रा.रवींद्र चव्हाण उपस्थित राहणार आहेत.

संयुक्त महाराष्ट्रासाठी झालेले मोठे आंदोलन, १९६० सालची राज्य स्थापना आणि त्यानंतरच्या राजकीय-सामाजिक घटना-प्रसंगांचे पत्रकार या नात्याने महत्त्वाचे साक्षीदार असलेल्या भावे यांचे 'महाराष्ट्र-६५' ह्या विषयावर भाषण होणार असल्याचे संयोजक संजीव कुळकर्णी यांनी सांगितले.

महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीत १ मे २०२५ रोजी ६५ वर्षे पूर्ण झाल्याप्रीत्यर्थ भावे यांनी 'महाराष्ट्र ६५' हे पुस्तक अलीकडे प्रकाशित केले. सुमारे १५ वर्षांपूर्वी त्यांनी राज्याच्या सुवर्ण महोत्सवानिमित्त महाराष्ट्रात ठिकठिकाणी १०६ व्याख्याने दिली होती. त्यातील एक (५४वे) व्याख्यान नांदेडमध्ये झाले होते. यशवंतराव चव्हाण ते सध्याचे देवेन्द्र फडणवीस या मुख्यमंत्र्यांची राजवट भावे यांनी पाहिली आणि अभ्यासली आहे. आता ते गेल्या ६५ वर्षांतल्या महाराष्ट्राचा धांडोळा आपल्या भाषणांतून घेणार आहेत.

वरील कार्यक्रम सर्वांसाठी खुला असून सर्वांनी उपस्थित राहण्याचे आवाहन संयोजक संजीव कुळकर्णी यांच्यासह डॉ. संजय कदम, श्याम दरक, महेश देशमुख तरोडेकर, भगवानराव आलेगावकर, डी. बी.जांभरुनकर, संदीप देशमुख बारडकर, सतीश कुलकर्णी मालेगावकर, आनंद चव्हाण यांनी केले आहे.

## जिल्ह्यात जमावबंदी, शस्त्रबंदी आदेश लागू

**नांदेड (प्रतिनिधी)–** नांदेड जिल्ह्यात ३० जून २०२५ च्या मध्यरात्री पर्यंत शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश लागू राहणार आहे, अशी माहिती अपर जिल्हादंडाधिकारी कार्यालयाकडून देण्यात आली आहे.

जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था अबाधित रहावी म्हणून अपर जिल्हादंडाधिकारी यांनी मुंबई पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७ (१) व (३) अन्वये जिल्ह्यात दि. १६ जून रोजी सकाळी ६ वाजेपासून ते ३० जून २०२५ रोजी मध्यरात्री पर्यंत शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश लागू राहिल. त्यानुसार पाच किंवा पाचपेक्षा अधिक व्यक्तींनी या आदेशात नमुद असलेली कृत्ये सार्वजनिक परिसर किंवा त्याच्या जवळपास करण्यास बंदी घालण्यात आली आहे. हा आदेश कामावरील पोलीस अधिकारी, शासकीय कर्मचारी, विवाह, अंत्ययात्रा, धार्मिक कार्यक्रम, यात्रा व इतर सक्षम अधिकारी यांनी विशेषरित्या परवानगी दिलेल्या मिरवणुकांना लागू होणार नाही, असे अपर जिल्हादंडाधिकारी कार्यालयाकडून कळविण्यात आले आहे.

## पत्रकार उमरीकर यांची दुचाकी चोरीला

**नांदेड (प्रतिनिधी)–** शहरातील शिवाजीनगर भागातून चोरट्यांनी एका पत्रकाराची दुचाकी भरदिवसा चोरुन नेली आहे. याबाबत शिवाजीनगर ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

'पुण्यनगरी'चे पत्रकार कृष्णा उमरीकर यांनी त्यांची दुचाकी (एमएच २६ एए २०५२) नेहमीप्रमाणे दि. १३ जून रोजी दुपारी पावणे १२ वाजता शिवाजीनगरस्थीत पुण्यनगरी कार्यालयासमोरील भिंतीला कुलुप लावून ठेवली आणि काम करीत बसले. त्याच दिवशी दुपारी ३ च्या सुमारास ते बाहेर जाण्यासाठी आले असता त्यांना त्यांची दुचाकी आढळून आली नाही. उमरीकर व पुण्यनगरीतील सहकारी मित्रांनी लगेच परिसरात या दुचाकीचा शोध घेतला. तसेच शिवाजीनगरचे तकालीन पोलिस निरीक्षक गुरमे यांना भ्रमणध्वनीवरुन माहिती दिली. त्यांनी गुन्हे शोध पथकाला पुण्यनगरी कार्यालयात पाठवले आणि सीसीटीव्ही फुटेज घेतले. या दुचाकीची किंमत ४० हजार रुपये आहे. चार दिवस या दुचाकीचा शोध घेतल्यानंतर कृष्णा उमरीकर यांनी सोमवारी दि १६ जून रोजी दुपारी शिवाजीनगर पोलिस ठाणे गाठून फिर्याद दिली. त्यानुसार शिवाजीनगर पोलिस ठाण्यात गुरनं २३१/२५ कलम ३०३ (२) बीएनएस दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास अनिल झामरे करीत आहेत.

# माहूर रुग्णालयात १०० खाटांचे उपजिल्हा रुग्णालय मंजूर करा; नगराध्यक्ष दोसानी यांची मागणी

**माहूर (प्रतिनिधी)–** येथील ट्रामा केअर सेंटर उभारण्याची मागणी प्रलंबित आहे. या मागणीच्या निमित्ताने उपसंचालक लातूर यांनी ट्रामा केअर सेंटर ऐवजी ५० खाटांचे उपजिल्हा रुग्णालय मागवून घेतले होते. हे प्रस्ताव मंजुरी साठी मंत्रालयात आहे. मात्र तीर्थक्षेत्र माहूर येथील लोकसंख्या लक्षात घेऊन सर्व सुविधायुक्त असे १०० खाटांचे शासकीय उपजिल्हा रुग्णालय आणि त्या अनुषंगाने सुविधा द्यावी, तसेच शहरातील जीर्ण झालेल्या विद्युत तारा बदलून त्याऐवजी केबल्स केबल बसविण्यात यावेत, अशी मागणी नगराध्यक्ष फिरोज दोसानी यांनी राज्याच्या सार्वजनिक आरोग्य व कुटुंबकल्याण राज्य मंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांच्या कडे निवेदनाद्वारे केली आहे.




माहूर तिर्थ क्षेत्र असल्याने व माहूर शहराची लोकसंख्या २५ हजारांच्यावर आहे. तालुक्यातील ९२ गावांतील २ लक्ष नागरीक व भाविकांना आरोग्य सुविधा पुरविण्यासाठी माहूर येथे एकमेव ग्रामीण रुग्णालय आहे. दैनंदिन आवागमन करणाऱ्या भाविकांच्या आरोग्य सुविधांसाठी व तालुक्यातील गोरगरिब, दिन दलित आदिवासी बहुजन नागरीकांच्या सेवेसाठी माहूर येथे एकमेव ग्रामीण रुग्णालय आहे.

त्यामुळे या ठिकाणी खाजगी तत्वावर असलेले डॉयलीसीस सेंटर शासना मार्फत कायम स्वरुपी उपलब्ध करुन सुविधांसह १०० खाटांचे उपजिल्हा रुग्णालय मंजूर करावे, अशी मागणी नगराध्यक्ष फिरोज दोसानी यांनी सार्वजनिक आरोग्य व कुटुंबकल्याण राज्य मंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांच्याकडे निवेदनाद्वारे केली. यावर ना. बोर्डीकर यांनी सकारात्मक प्रतिसाद दिल्याचे नगराध्यक्ष दोसानी यांनी सांगितले.

# किनवट बस आगाराला १० नवीन बसेसची प्रतीक्षा; उत्पन्नात १६.४२ लाख रूपयांची भर

**किनवट (प्रतिनिधी)–** उन्हाळी सुट्टी व लग्नसराईमुळे किनवट बस आगाराच्या उत्पन्नात १६ लाख ४२ हजार रुपयांची भर पडली आहे. सध्या आगारात ४३ बसगाड्या असून, आणखी १० नव्या बसगाड्या लवकरच आगारात दाखल होणार आहेत.

उन्हाळी सुट्टी व लग्नसराई हा गर्दीचा हंगाम लक्षांत घेवून दरवर्षी जादा बसगाड्यांचे नियोजन करण्यात येते. किनवट आगारात पूर्वी ३७ बसगाड्या होत्या. यात मानवविकासच्या ६ नव्या बसगाड्यांची भर पडली. ऐन गर्दीच्या हंगामात आगाराला नव्या बसगाड्या मिळाल्याने उत्पन्नात आणखी भर पडली. या आगारात ८५ चालक व वाहकांची पदे आहेत.आजघडीला ७५ चालक, तर ७२ वाहक कर्तव्यावर सेवारत आहेत.चालक, वाहकांची मंजूर सर्व पदे भरली गेली असल्यास आगाराच्या उत्पन्नात आणखी भर पडली असती. बहुतांश रस्ते राष्ट्रीय व राज्यमार्ग बनल्याने प्रवासाचा वेळ वाचत असल्याने दीडशे किलोमिटर आतच्या गावांना जादा फेऱ्या मारणे सुलभ झाल्याची माहिती आगारप्रमुख वाय. एच. खिल्लारे यांनी दिली. आगारात लवकरच आणखी १० नव्या बसगाड्यांची भर पडणार असल्याचेही त्यांनी संगितले.



## पंढरपूर यात्रेसाठी बसगाड्यांचा ताफा सज्ज

आषाढी एकादशीनिमित्त पंढरपूर यात्रेसाठी किनवट आगाराकडून प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी बसगाड्यांचे नियोजन करण्यात आले आहे. दि. २ ते १३ जुलैपर्यंत पंढरपूर यात्रेसाठी किमान १० बसगाड्या सज्ज असणार आहेत. शिवाय, यात्रेसाठी ४० भाविक जमल्यास जादागाडी सोडण्याचे नियोजनही करण्यात आले आहे.

**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.
फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ / मुंबई ९९६७०६२३५४
ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com